
रायगड, नवी मुंबई
♦ वर्ष १८ ♦ अंक ५
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार २२ जुलै २०२५ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹२

अंतरंग

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून महत्त्वाचे पाऊल/२
सिडकोकडून ग्रामस्थांना नुकसानभरपाई अदा/६
अरुणा, नुपूर बुद्धीबळ स्पर्धेत पदकाच्या मानकरी/८

## टेकऑफनंतर इंडिगो विमानाचे आपत्कालीन लँडिंग



**इंदूर :** गोव्याहून इंदूरला येणाऱ्या इंडिगो फ्लाईट क्रमांक ६ए ८१३चे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. विमानात सुमारे १४० प्रवासी होते. हे विमान सोमवारी (दि. २०) गोव्याहून इंदूरला येत होते, पण विमान लँडिंग मोडमध्ये येताच पायलटला कॅरेज अलर्टचा आवाज आला. पायलटने ताबडतोब एटीसीशी संपर्क साधला आणि आपत्कालीन लँडिंगसाठी परवानगी मागितली. आपत्कालीन लँडिंगसाठी सर्व उपाययोजना करण्यात आल्या आणि विमान सुरक्षितपणे उतरवण्यात आले. पायलटने योग्य वेळी या अलर्टकडे लक्ष दिल्याने महत्त्वाच्या अनर्थ टळला. याआधी रविवारी संध्याकाळी आंध्र प्रदेशातील तिरुपतीहून तेलंगणाची राजधानी हैदराबादला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात अचानक बिघाड झाला आणि नंतर या विमानाचे तिरुपतीमध्येच आपत्कालीन लँडिंग करावे लागले होते.

# क्रिएटर्स इकॉनॉमीचे महाराष्ट्र केंद्र बनेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास; सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य विभाग आणि पुण्यातील फिल्म अ‍ॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) यांच्यात सामंजस्य कराराच्या अनुषंगाने 'क्रिएटर्स इकॉनॉमी'च्या विकासासाठी कुशल मनुष्यबळ विकासाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. ही केवळ सहकार्याची सुरुवात असून येत्या काळात महाराष्ट्र हे देशाच्या आणि जगाच्या क्रिएटर्स इकॉनॉमीचे केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एफटीआयआय पुणे आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ (एमएफएससीडीसी) मुंबई यांच्यात सोमवारी (दि. २१) सामंजस्य करार झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार, 'एफटीआयआय'चे अध्यक्ष आणि अभिनेते आर.माधवन, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, 'एफटीआयआय'चे कुलगुरू धीरज सिंग, 'पीआयबी'च्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा, राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मकदूम, 'एफटीआयआय'चे प्रा. संदीप शहारे, तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आज सामान्य माणूसही एक क्रिएटर झालेला आहे. त्याच्या सर्जनशीलतेच्या जोरावर एक स्वतंत्र स्पेस त्याने निर्माण केली असून ही क्रिएटिव्ह स्पेस आता मोनेटाईज होऊ लागली आहे. त्यामुळे क्रिएटर्स इकॉनॉमी ही आजची गरज बनली आहे.

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, या वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम मानव संसाधनाची नितांत आवश्यकता आहे. अनेकांकडे कौशल्य असूनही प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना व्यावसायिक संधी मिळत नाहीत. या करारामुळे ट्रेनिंग आणि सर्टिफिकेशन या दोन्ही गोष्टी मिळणार आहे.



# अनधिकृत भोंग्यांविरोधात ठोस पावले उचला!

## भाजप नेते किरीट सोमय्यांची पनवेल दौऱ्यात पोलिसांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धर्माच्या नावाखाली कोणतीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही. कायदा व सुव्यवस्था पाळलीच पाहिजे, असे ठाम मत भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवारी (दि. २१) पनवेल दौऱ्यादरम्यान व्यक्त केले. अनधिकृत भोंग्यांमुळे वाढणाऱ्या ध्वनीप्रदूषणावर आणि नागरिकांच्या नाराजीवर त्यांनी चिंता व्यक्त करत प्रशासनाने या संदर्भात ठोस पावले उचलावीत, अशी मागणीही केली.


महाराष्ट्र भोंगामुक्त मोहिमेला गती देण्यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत पनवेलचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात वरिष्ठ निरीक्षक अजय कांबळे, कळंबोली पोलीस ठाण्यात वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कोते आणि तळोजा पोलीस ठाण्यात वरिष्ठ निरीक्षक प्रवीण भगत यांची भेट घेत शहरातील अनधिकृत भोंगे हटवण्याची मागणी केली. किरीट सोमय्या यांच्या मागणीला पोलिसांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून येत्या आठ दिवसांत कारवाई करून अनधिकृत भोंगे बंद करण्याचे आश्वासन दिले आहे.

या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, बबन मुकादम, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, कळंबोली शहर मंडळाचे माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष किरण पाटील, निर्दोष केणी, अमर उपाध्याय, वासुदेव पाटील, किर्ती नवघरे, शैलेंद्र त्रिपाठी, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# पनवेल परिसरात आज विविध ठिकाणी रक्तदान शिबिर

## लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि. २२) पनवेल परिसरात विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल उत्तर मंडळाचे रक्तदान शिबिर रामशेठ ठाकूर महाविद्यालय से. ३, पेठगाव येथे; खारघर शहर मंडळ शिबिर रामशेठ ठाकूर स्कूल, से. १९, खारघर येथे; कामोठे शहर मंडळ शिबिर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय से. ३६, कामोठे येथे; कळंबोली शहर मंडळ शिबिर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय से. ८ कामोठे येथे; पनवेल शहर मंडळ शिबिर भाजप मध्यवर्ती कार्यालय पनवेल येथे; नवीन पनवेल मंडळाचे शिबिर रोटरी ब्लड बँक खांदा कॉलनी; तर पनवेल पूर्व मंडळाचे शिबिर सेंट अँड्र्यू स्कूल आकुर्ली येथे होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात विविध विधायक उपक्रम राबवले जात आहेत. पनवेलमध्ये रक्त संकलन करण्याचा उद्देश ठेवून मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवशी विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अधिकाधिक रक्तदात्यांनी सहभाग घेऊन हा सामाजिक उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.

# मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोटातील सर्व १२ दोषींची निर्दोष मुक्तता

■ राज्य सरकार सुप्रीम कोर्टात जाणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई लोकलमध्ये २००६ साली झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहे.

विशेष न्यायालयाने दोषींपैकी पाच जणांना फाशीची शिक्षा, तर उर्वरित सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. दोषींनी शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, तर सरकारने फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी याचिका दाखल केली होती. हायकोर्टाने सोमवारी (दि. २१) सर्व दोषींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष सुटका केली. यातील एकाचा आधीच मृत्यू झाला आहे.

११ जुलै २००६ रोजी झालेल्या आरडीएक्स स्फोटांमध्ये १८९ नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर ८२७ प्रवासी जखमी झाले होते. ११ मिनिटांत झालेल्या सात साखळी स्फोटांनी मुंबईत हादरली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, उच्च न्यायालयाचा निकाल खूपच धक्कादायक आहे आणि आम्ही त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देऊ, असे म्हटले आहे.

## निवडक

### बांगलादेशमध्ये विमान कोसळून १९ जणांचा मृत्यू

**ढाका :** बांगलादेश हवाई दलाचे प्रशिक्षणासाठी वापरले जाणारे विमान सोमवारी (दि. २१) राजधानी ढाका येथील शाळेवर कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत किमान १९ जणांचा मृत्यू झाला असून ७०हून अधिक जण जखमी असल्याचे सांगितले जात आहे. चिनी बनावटीचे एफ-७ हे विमान ढाकाच्या उत्तरा भागातील माइलस्टोन स्कूल अँड कॉलेज इमारतीवर कोसळले. या दुर्घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

### ज्येष्ठ माकप नेते व्ही.एस. अच्युतानंदन यांचे निधन

**तिरुवनंतपुरम :** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक आणि केरळचे माजी मुख्यमंत्री व्ही.एस. अच्युतानंदन यांचे सोमवारी (दि. २१) निधन झाले. तिरुवनंतपुरम येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते १०१ वर्षांचे होते. वाढते वय आणि आजारपणांमुळे ते सार्वजनिक जीवनापासून दूर आपल्या मुलाच्या घरी राहत होते.

# पोलादपूरमधील शाळेत अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग

## नराधम शिक्षकाला फासले काळे; आज शाळा व्यवस्थापनाची बैठक



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या पोलादपूर विद्यामंदिर प्रशालेमध्ये एका शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यानंतर संबंधित शिक्षकाच्या तोंडाला काळे फासण्यात आले. या संदर्भात मंगळवारी (दि. २२) सकाळी शाळा व्यवस्थापनासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती 'रयत'चे गव्हर्निंग बॉडी मेंबर व स्थानिक शाळा सभापती निवास शेठ यांनी दिली.

काही अल्पवयीन विद्यार्थिनींनी पालक तसेच समाजसेवकासोबत एका शिक्षकाबद्दल तो शरीराला लज्जा उत्पन्न होईल अशा पद्धतीने स्पर्श करीत असल्याची तक्रार १९ जुलै रोजी मुख्याध्यापक आणि स्थानिक शाळा सभापती यांच्याकडे केली. तत्पूर्वीच समाजसेवकाने ज्या शिक्षकाबद्दल तक्रार होती, त्याच्या चेहऱ्याला काळा रंग फासून संताप व्यक्त केला.

या संदर्भात मंगळवारी विद्यार्थिनी, पालक, मुख्याध्यापक, शिक्षक, समाजसेवक, शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक शिक्षण सभापती तसेच कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले असल्याची माहिती निवास शेठ यांनी दिली. त्यामुळे बैठकीत प्रकरणाबाबत पुढील कार्यवाहीसाठी पावले उचलली जाण्याची शक्यता आहे.

# न्या. वर्मांविरुद्ध महाभियोग चालणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



घरात बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी चर्चेत आलेले उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांना त्यांच्या पदावरून हटविण्यासाठी संसदेत महाभियोगाची प्रक्रिया सुरू झाली आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सोमवारी (दि. २१) पहिल्या दिवशी १४५ लोकसभेच्या खासदारांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध आणलेल्या महाभियोग प्रस्तावावर स्वाक्षरी केली, तर राज्यसभेतील ५४ खासदारांनी महाभियोग प्रस्तावाला पाठिंबा दिला.

संविधानानुसार सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना काढून टाकण्याच्या राष्ट्रपतींच्या आदेशानंतर किमान १०० लोकसभा किंवा ५० राज्यसभेच्या खासदारांनी स्वाक्षरी केलेला प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे. प्रस्ताव स्वीकारावा की नाही हे सभापती किंवा अध्यक्ष ठरवतात. न्यायाधीशांना पदावरून हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी आवश्यक संख्येपेक्षा ही जास्त आहे. खासदारांनी स्वाक्षरी केलेले निवेदन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना सादर केल्यानंतर महाभियोगाची पुढील कार्यवाही सुरू झाली आहे.

# प्रियकराच्या मदतीने पत्नीने केली पतीची हत्या

## मृतदेह घरातच पुरून पलायन

**नालासोपारा : प्रतिनिधी**




नालासोपारा शहराच्या धानीवबाग परिसरात पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीची निर्घृण हत्या करून त्याचा मृतदेह राहत्या घरात पुरला. इतकेच नव्हे तर त्या मृतदेहावर त्यावर नवीन टाईल्स लावल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी (दि. २१) सकाळी उघडकीस आला. पेल्हार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे.

धानीवबागच्या गांगडीपाडा येथील साईशारदा वेल्फेअर सोसायटीत राहणाऱ्या विजय चौहान (३४) यांची हत्या करण्यात आली. त्यांची पत्नी चमन देवी (२८) आणि प्रियकर मोनू शर्मा (२०) याच्या मदतीने ही निर्घृण हत्या करून त्यांचा मृतदेह घरातच पुरला गेला. धक्कादायक म्हणजे मृतदेह पुरल्यावर त्यावर टाईल्सदेखील लावण्यात आल्या. हा प्रकार १५ दिवसांनी उघड झाला. आरोपी पत्नी ही प्रियकरासोबत फरार झाली आहे.

अखिलेश चौहान (२४) याने रविवारी रात्री भाऊ विजयचा शोध घेऊनही काही पत्ता लागत नसल्याने पेल्हार पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. शेजारी राहणाऱ्या प्रियकर मोनूसोबत आरोपी चमनदेवी पळून गेल्याची माहितीही अखिलेश याने दिली तसेच त्या परिसरातील मोबाईलवाला सर्वेश गिरी याचाही यात सहभाग असल्याचा आरोपही त्याने केला. त्यामुळे पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन तपास व आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# पनवेलमध्ये अभय योजनेला नागरिकांचा प्रतिसाद

## चार दिवसात १३ कोटींचा मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत देत पनवेल महापालिकेने १८ जुलैपासून २० सप्टेंबरपर्यंत अभय योजना विविध टप्प्यांमध्ये लागू केली आहे. या योजनेचा महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद दिसून येत आहे. अवघ्या चार दिवसात पालिकेच्या तिजोरीत १३ कोटी १६ लाख मालमत्ता कर जमा झाला आहे.



पनवेल महापालिकेने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. विविध विकास कामांमध्ये प्रस्तावित कामांमध्ये नवीन मुख्यालय बांधणे, मच्छी मार्केट, बहुमजली वाहनतळ, शाळा, दैनिक बाजार, प्रभाग कार्यालये, 'हिरकणी' हे माता व बाल संगोपन रुग्णालय-सर्वसमावेशक ४५० बेडचे हॉस्पिटल पालिका उभारत आहे. या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्रोत आहे. त्यामुळे मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

थकीत मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत देण्याबाबत अभय योजनेमध्ये चार महत्वाचे टप्पे आहेत. यामध्ये प्रामुख्याने १८ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण मालमत्ताकर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ९० टक्के सूट मिळणार आहे. त्यामुळे मालमत्तांधारकांनी या संधीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपला पूर्ण मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. १६ ते ३१ ऑगस्ट या कालाधीत संपूर्ण मालमत्ता कर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ७५ टक्के सूट मिळेल. या पुढील काळात म्हणजे १ ते १० सप्टेंबर कालावधीत संपूर्ण मालमत्ता कर एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ५० टक्के सूट मिळेल आणि ११ ते २० सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण मालमत्ता कर एकरकमी भरल्यास असलेल्या शास्तीमध्ये २५ टक्के सूट असेल. ही अभय योजना केवळ एकवेळची विशेष आणि अंतिम बाब म्हणून जाहीर करण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेची वेबसाईट, पीएमसी टॅक्स अ‍ॅप अथवा पनवेल कनेक्ट अ‍ॅपद्वारे नागरिकांनी मालमत्ता कर ऑनलाईन भरल्यास त्यांना दोन टक्के सवलत मिळेल तसेच चालू वर्षाचा म्हणजे २०२५-२६चा कर ३१ जुलैपर्यंत भरल्यास त्यांना या करामध्ये पाच टक्के सूट मिळेल. नागरिकांनी लवकरात लवकर कर भरणा करून याचा लाभ घ्यावा, असे मालमत्ता कर उपायुक्त स्वरूप खारगे यांनी आवाहन केले आहे.

### नवीन मालमत्ता कर संकलन केंद्र

प्राईड सोसायटी सेक्टर, ७ खारघर; महा ई-सेवा केंद्र-गंगा टॉवर, सेक्टर २१, कामोठे; महा ई सेवा केंद्र-ऍलियश बिल्डींग से १७, प्लॉट नं ८४, मोठा खांदा, नवीन पनवेल; सर्व पाच प्रभाग कार्यालये (नावडे उपविभागासहित) आणि मुख्यालय पनवेल.

# कोकण रेल्वेची आता कार फेरीसेवा

## गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांचा प्रवास होणार सुकर

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी गावी जायचंय, पण रेल्वेचे तिकिट मिळत नाहीत. तिकिट मिळाले तरी स्टेशनपासून गावापर्यंत जाण्यासाठी पुढचा प्रवास करणे कधीकधी अधिक किचकट ठरते. अशावेळी स्वतःच्या कारने आलो असतो, तर असा प्रश्न चाकरमान्यांना पडतो, मात्र मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे पोहचायलाच खूप वेळ लागतो. आता लवकरच प्रवाशांचा प्रवास सुकर आणि आरामदायी होणार आहे. कोकण रेल्वेने एक खास सेवा आणली आहे.

आता तुमच्या मालकीची कार तुम्ही रेल्वेने कोकणातील गावी घेऊन जाता येणार आहे. कोकण रेल्वे २३ ऑगस्टपासून महाराष्ट्रातील कोलाड ते गोव्यातील वेर्णापर्यंत ही सेवा सुरू करीत आहे. यामुळे २०-२२ तासांचा प्रवास रस्ते मार्गाचा प्रवास अवघ्या १२ तासांत पूर्ण होईल. गणेशोत्सवासाठी ही सर्वात मोठी भेट चाकरमान्यांसाठी असणार आहे.



एका ट्रेनमध्ये साधारण ४० कार घेऊन जाता येतील. याचे शुल्क ७,८७५ प्रति कार इतके असेल. या गाड्या बेल्टने बांधल्या जातील. सुरक्षिततेसाठी हँडब्रेक लावले असतील याची खातरजमादेखील केली जाईल, मात्र प्रवासादरम्यान कोणालाही कारमध्ये बसण्याची परवानगी नसणार. प्रवाशांना त्यासोबतच असलेल्या प्रवासी कोचमधून प्रवास करता येणार आहे. कोकण रेल्वेच्या या सेवेमुळे नागरिकांचा प्रवास सुकर व आरामदायी होणार आहे.

कार घेऊन जाणारी ट्रेन कोलाडवरून संध्याकाळी मार्गस्थ होईल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी वेर्णा येथे पोहचेल. प्रवाशांना ट्रेन निघण्यापूर्वी साधारण दोन-तीन तास आधी हजर असणे गरजेचे आहे. ट्रेनमध्ये खास २० डबे असतील आणि प्रत्येक वॅगनमध्ये दोन गाड्या ठेवता येतील. ही सेवा सुरू होण्यासाठी किमान १६ गाड्यांची बुकिंग आवश्यक आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे महत्त्वाचे पाऊल

## क्राउड फंडिंग आणि त्रिपक्षीय सामंजस्य करारातून उपचाराचा मार्ग झाला मोकळा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात प्रथमच मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून क्राउड फंडिंग आणि त्रिपक्षीय सामंजस्य करारातून गरिब व गरजू रूग्णांना उपचार देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून 'त्रिपक्षीय सामंजस्य करार आणि क्राउड फंडिंग' या दोन आर्थिक मदतीच्या संकल्पनांवर आधारित ही मदत देण्यात येणार आहे. त्यात कॉर्पोरेट कंपन्या, दाते आणि रुग्णालये यांचे सहकार्य रूग्णांना मिळणार असून, त्यातून हजारो रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या वैद्यकीय उपचारांचा लाभ देता यावा यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून त्रिपक्षीय करार लवकरच करण्यात येणार आहे. राज्यात प्रथमच मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रूग्णांसाठी क्राउड फंडिंग सुरू करण्यात येत आहे. ज्या रुग्णांच्या उपचाराचा खर्च १० लाखांपेक्षा अधिक असेल, असे दुर्धर व गंभीर आजाराचे रूग्ण क्राउड फंडिंगसाठी पात्र ठरणार आहेत. या अशा रूग्णांना कक्षा तर्फे बनविण्यात आलेल्या स्वतंत्र पोर्टल मार्फत अर्ज सादर करावा लागणार आहे. तीन महिन्याच्या कालावधीत हे पोर्टल कार्यरत होणार आहे. ज्यावेळी रूग्णांच्या उपचाराचा खर्च कोट्यावधीमध्ये असतो, त्यावेळी सर्व योजनांचा फायदा घेवूनही निधीची कमतरता भासते, त्यावेळी क्राउड फंडिंग महत्त्वाचे ठरणार आहे.

रूग्णांच्या पात्रतेची तपासणी आणि पारदर्शक प्रक्रियेसाठी नियामक यंत्रणा स्थापन करण्यात येणार आहे. ही सुविधा ग्रामीण आणि शहरी भागातील गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल. रूग्णांना वेळेत उपचार मिळावेत याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारातून ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली जात आहे. असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीला परदेशातून निधी स्वीकारण्यासाठी आवश्यक असलेली एफसीआरए (फॉरेन काँट्रीब्युशन रेग्यूलेशन अ‍ॅक्ट) मान्यता नुकतीच प्राप्त झाली आहे. या परदेशी निधीचा वापर गरजू रुग्णांच्या उपचारासाठी करण्यात येणार आहे.

शासनाकडून मिळणाऱ्या करसवलतींच्या बदल्यात, या रुग्णालयांना त्यांच्या एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा वार्षिक उत्पन्न १.८० लाखांपर्यंत असलेल्या कुटुंबांसाठी मोफत राखीव ठेवाव्या लागतात. तर, १० टक्के खाटा ३.६० लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी सवलतीच्या दरात उपचाराकरिता राखीव ठेवाव्या लागतात. या व्यवस्थेमुळे गरीब रुग्णांना मोठ्या रुग्णालयांतून उपचार मिळतात. अर्ज प्रक्रिया किंवा इतर कुठल्याही प्रकारच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




### सहा महिन्यांच्या काळातील मदत

१ जानेवारी ते ३० जून २०२५पर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातून १४ हजार ६५१ रूग्णांना १२८ कोटी ६६ लाख ६८ हजार रूपयांची मदत करण्यात आली. तर, धर्मादाय रूग्णालय मदत कक्षातून १ जानेवारी ते ३१ मे २०२५ दरम्यान, दोन लाख ३२ हजार २६५ रूग्णांना १६५ कोटी चार लाख २४ हजार ८५७ रूपयांची मदत करण्यात आली.

# बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

## चौक-कर्जत मार्गावर दंडाची वसुली

**चौक : प्रतिनिधी**

चौक ते कर्जत मार्गावर शनिवार रविवार दोन्ही दिवस वाहतूक कोंडी होत असून, बेशिस्त वाहन चालकांना ट्रॅफिक पोलिसांनी दंड आकारला असून दोन दिवसांत १८५०० एवढी रक्कम दंड स्वरूपात वसूल केली. ही कारवाई वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरून कर्जत कडे जाताना शनिवारी, रविवारी पावसाळी पर्यटक हे या मार्गावरील आणि पुढे कर्जत तालुक्यातील फॉर्म हाऊस, रिसॉर्ट, हॉटेल, नदी धबधबे येथे पर्यटनासाठी येतात. या मार्गावर चहा दुकान, बिअर शॉप, वाईन शॉप व हॉटेल असल्याने हे पर्यटक आपल्या गाड्या अस्ताव्यस्त उभ्या करत असतात आणि ट्रॅफिक जॅम करतात, पंधरा मिनिटांच्या अंतरासाठी दोन दोन तास वाहतूक खोळंबत असते. याचा त्रास स्थानिक पोलीस, स्थानिक ग्रामस्थ, दुकानदार यांना होत आहे. शनिवार आणि रविवार या दोन दिवसांत येथील वाहतूक कोंडीने प्रवासी हैराण झाले असून चालक यांना हा मार्ग नकोसा झाला आहे.



दुर्दैवाने येथे काही झाल्यास त्याचे गंभीर परिणाम मोजावे लागतील, पण एखादा रुग्ण या मार्गाने तो त्याच्या घरी अथवा दवाखान्यात न जाता स्मशानभूमीकडे जाईल असेच चित्र दिसून येत आहे, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस यंत्रणा पेक्षा शिस्तीची गरज जास्त असल्याचे दिसून आले आहे.

हे सर्व चालक शहरात शिस्तीने जातात, मग इकडे आल्यावर यांना काय होते? शनिवार, रविवार चौक परिसरातील धबधबे, धरण, नदी येथेही पर्यटक असतात, या परिसरात आठवड्याला एका पर्यटकाचा मृत्यू होत असल्याने येथील पोलीस यंत्रणा विखुरली गेली आहे, याचा फटका वाहतूक कोंडीत होत आहे. शनिवारी रविवारी वाहतूक शाखेने बेशिस्त चालक यांच्यावर कारवाईचा बडगा दाखल केला असून शनिवार रविवार चौक फाटा येथे ३२ बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाई करून १८५०० (अठरा हजार पाचशे) दंड आकारण्यात आला आहे.

वाहतूक पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, सहा.पोलीस निरीक्षक तांडेल, पोहवा.साटाटे, सुपेकर, पोले, बबन घुले,आबा गेंड यांनी रात्री उशिरापर्यंत वाहतूक सुरळीत करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# आदिवासी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करा -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आदिवासी समाजातील नागरिकांच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत असून या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवारी येथे दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित आदिवासी विभागाच्या विविध योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्यचिकित्स श्री.पाटील, प्रकल्प संचालक, आदिवासी विभाग पेण आत्माराम धाबे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, रायगड विजय कुलकर्णी आदीसह इतर शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



या वेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, जिल्ह्यातील आदिवासी समाजातील नागरिकांच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके आढावा घेणार आहेत. याकरिता प्रत्येक विभागाने आपली कामे पूर्ण करावीत. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान धरती आबा ग्राम उत्कर्ष अभियान, वनहक्क दावे व इतर योजना याबाबत काही प्रलंबित कामे असतील तर ती कामे पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी उपस्थित सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

# महाड एसटी आगाराच्या ताफ्यात पाच बस दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड एसटी आगाराच्या ताफ्यामध्ये सोमवारी पाच नवीन लालपरी बसेस दाखल झाले आहेत. यामुळे गणेशोत्सवांमध्ये चाकरमान्यांना परतीच्या प्रवासात होणारा अडथळा दूर होण्यास मदत होईल.

मुंबई-गोवा महामार्गावरील ऐतिहासिक आणि मध्यवर्ती ठिकाण असलेल्या महाड एसटी आगाराच्या ताफ्यात सोमवारी पाच लाल परी बसेस दाखल झाल्या आहेत. या बसेसचे उद्घाटन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मंत्री भरात गोगावले यांच्यासह शिवसेना तालुकाप्रमुख रवींद्र तरडे, महाड एसटी आगार प्रमुख रितेश फुलपगार, जिल्हा वाहतूक निरीक्षक खैरे, शिवसेना पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



महाड एसटी आगारामध्ये असलेल्या शिवशाही बसेस आणि इतर बसेस जुन्या झाल्या आहेत. त्यातच लांब पल्ल्यासाठी गाड्यांची असलेली गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाने आणखी पाच गाड्या महाड आगाराकडे दिल्या आहेत. या गाड्या लांबपलल्याकरता वापरल्या जाणार असल्याने प्रवाशांची होणारी गैरसोय टाळता येणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

# उरण येथे आज रक्तदान शिबिर

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसनिमित्त स्तुत्य उपक्रम

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरण येथे भव्य रक्तदान शिबिर मंगळवारी (दि.२२) सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यत सरस्वती मंडप, उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नोलॉजी महाविद्यालय, पालक मैदान उरण येथे आयोजित करण्यात आले आहे.

रक्तदान शिबिर कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालय उरण, राष्ट्रीय सेवा योजन व उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नोलॉजी महा विद्यालय उरण, यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे.


यु.ई.एस, महाविद्यालय उरण प्राचार्य मीनाक्षी गुप्ता व कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालय उरण प्राचार्य वाल्मिकी गर्जे यांचे सहकार्य लाभणार आहे.

# साई धरणात बुडून एकाचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

मावळातील कासार साई धरणात संतोष शहाजी राऊत १९ याचा बुडून झाला मृत्यू . वन्यजीव रक्षक - मावळ आणि शिवदुर्ग मित्र मंडळ -लोणावळा यांनी घटनास्थळी दाखल होत शोध मोहीम राबवून मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात यश मिळवले.

कासारसई डॅममध्ये आलेल्या पाच पर्यटक वर्षा सहलीसाठी आले होते.



खोल पाण्याचा अंदाज न आल्याने संतोष पाण्यात बुडला असल्ल्याची खबर मिळताच शिवदुर्ग चे. निलेश गराडे, सुनिल गायकवाड, महेश मसने, राजेंद्र कडू, आकाश मोरे, अनिल आंद्रे, शुभम काकडे, विनय सावंत, अनिश गराडे, विकास दोड्डी, हर्षद काळोखे, योगेश दळवी, अजय हुगे घटनास्थळी दाखल होत दुर्दैवी संतोष शहाजी राऊत वय १९ रा. साने कॉलनी, चिखली, मूळगाव मालेगाव, ता. केज बीड याचे शव अथक प्रयत्नांती शोधून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# महावितरणने वीजपुरवठा सुरळीत करावा -आमदार रविशेठ पाटील



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील विद्युत वितरण मंडळाच्या विरोधात अनेक तक्रारी शासन दरबारी येत असून याची दखल घेत आमदार रविशेठ पाटील यांनी महावितरण अधिकारी, पेण नगर परिषद कर्मचारी यांची तातडीची बैठक लावण्यात आली होती. या वेळी तालुक्यातील ग्रामस्थांनी महावितरण कंपनीचे अधिकारी, अभियंता यांच्यावर आपला रोष व्यक्त केला.

या बैठकीस आमदार रविशेठ पाटील, प्रांत अधिकारी प्रवीण पवार, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, पेण न.प. मुख्याधिकारी जीवन पाटील, महावितरण अधिक्षक अभियंता धनराज बिक्कड, बाजरा समिती सभापती महादू मानकर, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, माजी जि.प.सदस्य प्रभाकर म्हात्रे, गणेश मूर्तिकार श्रीकांत देवधर, माजी नगरसेवक शोमेर पेणकर, अजय क्षीरसागर, अतिरिक्त अभियंता आकाश तायडे, उपकार्यकारी अभियंता दत्तात्रेय सांगळे आदींसह तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

गणपती सण जवळ आला असून पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणात गणेशमूर्ती बनविण्याचे काम जोमात सुरू असून या कामात खोडा घालण्याचे काम महावितरण कंपनी करीत असून अभियंता व अधिकारी वर्गाच्या गलथान कारभारामुळे वारंवार विद्यतु पुरवठा खंडित होण्याने गणपती कारखानदार व नागरिक हैराण झाले आहेत. यामुळे झालेल्या बैठकीत तालुक्यातील ग्रा. सरपंच, नागरिकांनी आमदार रविशेठ पाटील यांच्यासमोर अधिकाऱ्यांवर आपला रोष व्यक्त केला.

या वेळी पेण वाशी विभाग, दादर विभाग, शिहू विभाग, वडखळ, खारपाडा आदिवासी वाडी आदी भागातील विद्युत पुरवठा कशा प्रकारे सुरळीत होईल याबाबत काही त्रुटी असतील त्या लवकरात लवकर दूर कराव्यात अशा सूचना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले. विद्युत वितरणाच्या अधिकाऱ्यांनी अनेक ठिकाणी कामात ठेकेदारांना पाठीशी घालण्याचे काम केले असून अनेक ठिकाणी कामात भ्रष्टाचार केल्याचा आरोप यावेळी ग्रामस्थांनी केला. त्यामुळे तालुक्यात व शहरात अनेक वेळा विद्युत पुरवठा खंडित होत असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

या वेळी माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी कनिष्ठ अभियंता यांना धारेवर धरत अनेकवेळा विद्युत पुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी करूनसुद्धा परीस्थिती जैसे थे होत असून यापुढे जर विद्युत पुरवठा खंडित झाला अत्तरं होणाऱ्या परिणामाला अधिकारीवर्ग जबाबदार असेल असे प्रितम पाटील यांनी सांगितले तसेच पीएम सूर्यघर योजनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी विद्युत अभियंत्यांना केले.

या वेळी रविशेठ पाटील यांनी जनतेचा रोष पाहत येत्या आठवडाभरात महावितरण अभियंत्यांनी आपापल्या भागातील कामे मार्गी लावून विद्युत पुरवठा कसा सुरळीत होईल याकडे जातीने लक्ष द्यावे से सांगितले. या वेळी अधिक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी येत्या आठवडाभरात प्रलंबित कामे मार्गी लावून लवकरात लवकर विद्युत पुरवठा सुरळीत राहील, असे आश्वासन उपस्थितांना दिले तसेच पीएम सूर्यघर योजनेबाबत गावात आणि शहरात जनजागृती करण्यात येईल, असे सांगितले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सुरक्षित समाजासाठी अन्न विश्लेषण उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.२१) रसायनशास्त्र विभागाच्या वतीने सुरक्षित समाजासाठी अन्न विश्लेषण या नावाने एक आगळावेगळा जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश स्थानिक समुदायामध्ये अन्नातील भेसळीविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

या उपक्रमात विज्ञान शाखेतील द्वितीय वर्षाच्या व तृतीय वर्षाच्या ३७ विद्यार्थ्यांनी स्थानिक बाजारातून अन्नाचे नमुने संकलित केले आणि भेसळीचा तपास करण्यासाठी आधुनिक प्रयोगशाळा तंत्रांचा वापर करून विश्लेषण केले. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी दुध, पनीर, ताक, दही, चीज इत्यादी विविध अन्नपदार्थांची तपासणी केली ज्यामुळे ग्राहकांनी अन्नाची शुद्धता तपासणे किती महत्त्वाचे आहे हे अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या निरीक्षणांचे सादरीकरण शेजारच्या गृहनिर्माण सोसायटीमध्ये केले तसेच त्यांनी रहिवाशांना अन्न सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले तसेच भेसळ ओळखण्यासाठी उपयुक्त टिप्स दिल्या.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ प्रयोगात्मक ज्ञान मिळवण्याचे माध्यम नव्हते, तर सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणारा अनुभवदेखील ठरला. रसायनशास्त्र विभागाने हा उपक्रम राबवून केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही आपली जबाबदारी पार पाडली असल्याचे सिद्ध केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमामध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. नीलम लोहकरे रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. शुभांगी ठाकूर, प्रा. रूपाली नागरेकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# तळा शहराच्या पाणीपुरवठा योजनेची ना. तटकरेंकडून पाहणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहराच्या पाणीपुरवठा योजनेची महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी पाहणी करून अधिकारी व ठेकेदाराला दिल्या सूचना.

या वेळी नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगरसेवक मंगेश शिगवण, नाना भौड, प्रद्युम्न ठसाळ, राकेश वडके, अ‍ॅड. उत्तम जाधव, नगरसेवक, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

या वेळी तळा शहरासाठी होत असलेल्या पाणी योजनेच्या कामाची पाहणी करताना ना. आदिती तटकरे यांनी सदर योजनेचे कामा विषयी पाईपलाईन, पाण्याची टाकी यांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेऊन अपुर्ण असलेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्याविषयी सूचना दिल्या.



# ट्रेलरमधून किमती ऐवज चोरणारी चौकडी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील पनवेल ते शेडुंग जाणाऱ्या ओव्हरब्रीजजवळ लघवीकरिता थांबलेल्या ट्रेलर चालकाच्या ट्रेलरमधून मोबाईल, रोख रक्कम व इतर कागदपत्रे चोरणाऱ्या चौकडीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे.



याबाबतची तक्रार ट्रेलर चालक विनोद बिंद याने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गिजे, उपनिरीक्षक राजपूत, हवालदार धुमाळ, तांडेल, म्हारसे, देवरे, कुदळे, बाबर, शिपाई खताळ, भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार द्वारा अधिक माहिती घेतली असता सराईत गुन्हेगार अविनाश धारपवार (वय २२, रा. वनवेवाडी) याची माहिती मिळाली त्यानुसार त्याच्यासह त्याचे सहकारी राजकुमार वाघचौरे (वय २६, रा. पोयंजेवाडी), दीपक वर्मा (वय २५, रा. बारापाडा) व अनिकेत नाईक (वय २३, रा. बारापाडा) या चौकडीला ताब्यात घेतले असता त्यांच्या कडून गुन्ह्यातील मुद्देमालासह दोन दुचाकी व १५ मोबाईल फोन असा मोठा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

या चौकडीच्या अटकेमुळे अजूनही काही चोरी व लुटमारीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

## सराफ दुकानात चोरी

**पनवेल :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाशेजारील सराफ दुकानात अंगठी खरेदी करण्यासाठी आलेल्या दोन व्यक्तींनी चोरी केल्याची घटना घडली आहे. सराफ व्यावसायिकाने याबाबतची तक्रार पोलिसांना दिल्यावर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवला. न्यू गोल्ड पॅलेस या दुकानात एक महिला व पुरुष सोन्याचे दागिने घेण्यासाठी आले होते. त्यांनी अनेक दागिने खरेदी करण्यासाठी पाहीले. मात्र दागिने पसंद न पडल्याचा बहाणा करुन संबंधित जोडपे तेथून निघून गेले. काही दिवसाने सराफाने दुकानातील दागिन्यांचा तपशील पाहील्यावर त्यांना दोन अंगठ्या चोरी झाल्याचे समजले. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात सराफाने ६० हजार रुपयांच्या दोन अंगठ्या चोरी केल्याची तक्रार नोंदवली.

## वडघर येथून एक जण बेपत्ता

**पनवेल :** येथील वडघर गाव येथून एक इसम घरातील कोणास काही एक सांगता कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाणे येथे देण्यात आली आहे. मुक्तार मोहम्मद हनीफ अन्सारी (वय ४६) असे या व्यक्तीचे नाव असून, उंची पाच फूट दोन इंच, केस काळे, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ असून अंगात निळ्या रंगाचा टीशर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट आहे. तो वेडसर असून त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार विलास कारंडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उमरोली ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे किरण डांगरकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उमरोली ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भारतीय जनता पक्षाचे किरण धर्मा डांगरकर यांची सोमवारी (दि.२१) बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अंकुश पाटील, वाकडीचे माजी सरपंच नमेश पाटील, माजी सरपंच शांताराम पोपेटा, नितीन काठावले, उमरोलीच्या सरपंच श्वेता मढवी, सदस्य प्रितेश डांगरकर, शुभांगी मढवी, रोशन पोपेटा, अलका तांडेल, रेश्मा पाटील, कमला मढवी, बेबी ठाकूर, नारायण माळी, नारायण मढवी, शंभाजी वारदे, नरेश मढवी, अशोक पाटील, दिपक पाटील, लहु ठाकुर, सागर मढवी, ग्रामसेवक बी.एन. जगताप आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात धनुर्वात आणि घटसर्प प्रतिबंधक लसीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थी आरोग्यासाठी सतत कटिबद्ध असणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने गव्हाण, तालुका - पनवेल जिल्हा रायगड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रा मार्फत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील किशोरवयीन विद्यार्थ्यांना धनुर्वात व घटसर्प प्रतिबंधक लसीकरण अर्थात टी.डी. (टिटॅनस - डिप्थेरिआ) प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले.




धनुर्वात व घटसर्प यांसारख्या गंभीर आजारांपासून संरक्षण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारक शक्ती वृद्धींगत करण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने ही लसीकरण मोहीम राबविण्यात आली. गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका एस.व्ही.मेहेत्रे,आशा वर्कर सुगंधा घरत व सुनिता पाटील यांनी हे लसीकरण यशस्वीपणे पार पाडले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशीकला पाटील, आरोग्य विभाग प्रमुख विशांत ठाकूर, गुरुकुल विभाग प्रमुख संदिप भोईर, दहावी 'अ'चे वर्गशिक्षक प्रशांत परदेशी, कलाशिक्षक गणेश भोईर व विद्यार्थी उपस्थित होते. या लसीकरण मोहिमेच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्तविक विद्यालयाचे आरोग्य विभाग प्रमुख विशांत ठाकूर यांनी केले.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने विद्यालयातील २०० किशोरवयीन विद्यार्थ्यांचे टी. डी.प्रतिबंधक लसीकरण करण्यात आल्याचे आरोग्य विभाग प्रमुख विशांत ठाकूर यांनी सांगितले.

# पाले गावात आंब्याच्या कलमांचे मोफत वाटप

## भाजप नेते रवी भोईर यांच्या हस्ते वितरण

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

निसर्गाचे रक्षण व्हावे व शेतकऱ्यांना शेतीव्यतिरिक्त स्थिर उत्पन्न मिळून त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्थर उंचवावा या उद्देशाने उरण तालुक्यातील पाले गावातील श्रीया फाऊंडेशनच्या वतीने रविवारी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य व तथा उरण विधानसभा अध्यक्ष रवी भोईर यांच्या हस्ते मोफत शंभर आंब्याच्या कलमांचे वाटप करण्यात आले.



या वेळी श्रीया फाऊंडेशन पाले संस्था करीत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांचे कौतुक करण्याबरोबरच उपस्थितांना मार्गदर्शन करताना झाडे लावणे काळाची गरज आहे व त्याचे संगोपन करणे आपले कर्तव्य आहे. प्रत्येकाने वर्षातून किमान एक तरी झाड लावावे व ते पूर्णपणे जगवावे असे उपस्थितांना आवाहन केले. तर श्रीया फाऊंडेशन पालेच्या अध्यक्षा स्मिता म्हात्रे यांनी पाले गावातील शेतकऱ्यांना शेती बरोबरच पूरक व कायमस्वरूपी आर्थिक उत्पन्न मिळावे व त्यांचा आर्थिक स्तर उंचवावा म्हणून श्रीया फाऊंडेशन पाले संस्थेच्या वतीने शंभर आंब्याच्या कलमांचे वाटप करत आहोत, असे असे त्यांनी सांगितले.

या वेळी ऋषिकेश म्हात्रे मॅनेजर जेएनपीए ऋषिकेश म्हात्रे, भाजप उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, भाजप उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, उद्योगपती खोपटे देवेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे, निवृत्त पोलीस निरीक्षक चंद्रकांत म्हात्रे, निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक पोसुराम म्हात्रे, पंकेश म्हात्रे आवरे पंचायत समिती युवा अध्यक्ष पंकेश म्हात्रे, धर्मा म्हात्रे, गजानन म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, राजेश म्हात्रे, विनोद म्हात्रे, अनिल म्हात्रे, गंगाराम म्हात्रे, अविनाश म्हात्रे सर, संदीप म्हात्रे, अजित म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, अजय म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या देवयानी म्हात्रे, रुपाली म्हात्रे, प्रगती म्हात्रे, अनिता फडके, शैला म्हात्रे आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पोस्टर मेकिंग स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने मून डे अर्थात चंद्रदिनीचे औचित्य साधून पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन सोमवारी (दि.२१) भौतिकशास्त्र प्रयोगशाळेमध्ये करण्यात आले.

या स्पर्धेत २० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच चंद्रयान आणि मानवी चंद्र मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता तसेच विज्ञान विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी कला आणि विज्ञान यांचे सुंदर मिश्रण करून त्यांच्या कल्पनाशक्तीचा उत्कृष्ट वापर करून चंद्र आणि अंतराळाशी संबंधित विषयांवर पोस्टर सादर केली.

या वेळी विद्यार्थ्यांना पोस्टर महाविद्यालयातर्फे पुरवण्यात आले होते, तर रंगसाहित्य, ब्रश, पेन्सिल्स इत्यादी साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणले होते. संपूर्ण प्रयोगशाळा विविध रंगांनी, कलात्मक रचनांनी आणि वैज्ञानिक संकल्पनांनी नटलेली दिसत होती. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व शास्त्रीय दृष्टिकोनाचे कौतुक केले आणि विज्ञानाच्या क्षेत्रात अशा कलात्मक उपक्रमांच्या गरजेवर भर दिला. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये भाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेच्या आयोजन केल्याबद्दल भौतिकशास्त्र विभागाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर भौतिकशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश उदेकर, विद्यार्थी, इतर प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# रोडपाली येथे उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका उद्यान विभाग आणि रोडपाली रेसिडेन्सी वेलफेअर असोसिएशन, रोडपाली यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी रोडपाली येथील सेक्टर २०, मैदानाच्या सभोवताली वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम महापालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत रोडपाली, कळंबोली, मैदानाच्या सभोवताली, जांभूळ वृक्षांच्या ५० रोपांचे, वृक्षारोपण करण्यात आले. सहा. आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक विशाल हुडेकर, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक सुमित बोडके आणि महेश घोडसरे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# फडके विद्यालयातील विद्यार्थिनींना यष्टी प्रशिक्षण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचालित आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयातील १०० विद्यार्थिनींना सांस्कृतिक प्रकोष्ठ, कोकण विभाग, भाजप व राष्ट्र सेविका समिती, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने यष्टी प्रशिक्षण देण्यात आले.



काळाची गरज ओळखून सातवी व आठवीत शिकणाऱ्या इंग्रजी व मराठी माध्यमातील विद्यार्थिनींना यष्टी या प्राचीन शस्त्राच्या आधारे स्वसंरक्षण कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रास्ताविकात माध्यमिक विभाग-मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका समिता सोमण म्हणाल्या, आत्मनिर्भर मुली तयार करण्याच्या दृष्टीने हे पहिले पाऊल आहे. मुलींना त्यांच्या शारीरिक क्षमतांची ओळख या प्रशिक्षणातून झाली.

या उपक्रमाच्या समन्वयक व सांस्कृतिक प्रकोष्ठ कोकण विभाग भाजपच्या अध्यक्ष अक्षया चितळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींना शारीरिक बळ वाढवण्याचे प्रेमळ आवाहन केले. त्या पुढे म्हणाल्या, दहा हजार मुलींच्या सक्षमीकरणाचा आमचा संकल्प आहे. यष्टी या सहज उपलब्ध होणाऱ्या शस्त्राच्या वापरात मुली तरबेज झाल्या तर समाजात घडणारे अनुचित प्रकार रोखण्यास मदत होईल.

या वेळी व्यासपीठावर योगिनी डोंगरे, मानसी कोकजे व मंजुषा भावे आदी उपस्थित होते. यष्टी शिक्षिका म्हणून जान्हवी शिंदे, जान्हवी साठे, महती देशमुख, अनन्या जोशी, तन्वी जोशी आणि त्यांना सह शिक्षिका म्हणून अनुराधा ओगले, श्रद्धा देशमुख, कल्पना राऊत, अपराजिता घांगुर्डे, यांनी काम पाहिले. उत्तम यष्टी तरबेज अशा १० मुलींना पुस्तक व यष्टी भेट देऊन प्रोत्साहन देण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात आठवीतील श्रेया तांदळे हिने मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यालयातील मराठी माध्यमातील सहाय्यक शिक्षिका प्रीती धोपाटे यांनी सूत्रसंचालन केले, तर माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका मनिषा महाजन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात सेमीक्रॉन डॅनफॉसतर्फे स्टेम लॅबचे उद्घाटन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे विद्यार्थ्यांना दर्जेदार व नावीन्यपूर्ण शिक्षण देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. या प्रयत्नांना सहकार्य करण्यासाठी विविध सामाजिक संस्था समाजहिताच्या उद्देशाने मदत करीत असतात. पुणे येथील वास्को या सामाजिक संस्थेने सेमीक्रॉन डॅनफॉसतर्फे अद्यावत स्टेम लॅब विद्यालयात तयार करून दिली.



या स्टेम लॅबच्या उद्घाटनावेळी वास्को या सामाजिक संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेजर समाधान शिंदे, स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन व स्कूल कमिटी सदस्य जयदास गोवारी, माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे, ज्येष्ठ शिक्षक गावंड सर, लेखनिक गोवारी उपस्थित होते.

वास्को या सामाजिक संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेजर समाधान शिंदे यांनी स्टेम लॅबमध्ये विविध वैज्ञानिक संकल्पना वर आधारित ७९ मॉडेल्स तर गणितीय संकल्पना वर आधारित ३९ मॉडेल्स तसेच तिसरी ते दहावी इयत्तानुसार प्रात्यक्षिक किट दिले आहेत हे सांगितले.

या सर्वांचा वापर अध्यापनात कसा करायचा यासाठी विद्यालयातील विज्ञान व गणित शिक्षकांना वास्को. संस्थेतर्फे मार्गदर्शन दिले गेले. स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी यांनी सेमीक्रॉन डॅनफॉस या कंपनीचे व वास्को सामाजिक संस्थेने विद्यालयाला अद्यावत स्टेम लॅब दिल्याबद्दल समाधान शिंदे यांचा विद्यालयातर्फे सन्मान केला. तसेच विद्यालयाला स्टेम लॅब मिळवून देण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक अनिल पाटील सर यांचे कौतुक केले.

या उद्घाटनासाठी विद्यालयातील खुटले, पेरवी, गलांडे, सहाने, म्हसकर, व्ही.व्ही. फडतरे, डी. डी. पाटील मॅडम तसेच मोरे व कोळी शिपाई या सर्वांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील एस.डी. पाटील मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे कार्यक्रमावेळी आभार मानले.

## संपादकीय

# मग दोषी कोण?

या सर्वांवरचे आरोप सिद्ध करण्यात फिर्यादी पक्षाला पूर्णत: अपयश आले आहे असे उच्च न्यायालयाने ११ जुलै २००६च्या बॉम्बस्फोटमालिकेच्या खटल्यात निकाल देताना म्हटले आहे. हे असे कसे घडले असेल? तपासात नेमके काय चुकले? या स्फोटांमागचे खरे सूत्रधार कोण आहेत? त्यांना शिक्षा मिळावी यासाठी आणखी किती वर्षे वाट पहावी लागणार असे अनेक प्रश्न आज असंख्य मुंबईकरांना पडले असतील.

**तब्बल १९ वर्षांपूर्वी मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटांचे तपशील आता इतक्या वर्षांनी कुणाकुणाला स्मरत असतील? कितीही मोठी दुर्घटना किंवा संकट असो, दुसऱ्या दिवशी उठून पुन्हा आपल्या नित्याच्या दिनक्रमाप्रमाणे उपजिविकेसाठी धावणे हा सर्वसामान्य मुंबईकर माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग असतो. प्रत्येक दुर्दैवी वेळेस याच कथित 'मुंबईकर स्पिरिट'चा उदोउदो होतो. याच स्पिरिटनुसार झाले गेले सारे मागे टाकून मुंबईकर रोजच्या रोज धावत राहतो. त्यामुळेच १९ वर्षांपूर्वी, ११ जुलै २००६ रोजी पश्चिम रेल्वेवरील सात ठिकाणी एका मागोमाग एक झालेल्या बॉम्बस्फोटांच्या आठवणी एव्हाना बहुतेकांसाठी धुसरच झाल्या असतील. अपवाद असेल तो फक्त त्या बॉम्बस्फोटांमध्ये आपल्या आप्तस्वकीयांपैकी कुणाला तरी गमावलेल्यांचा किंवा त्यात जखमी झालेल्यांचा. त्या बॉम्बस्फोटांची आठवण स्मरणात असो वा नसो, त्या बॉम्बस्फोट प्रकरणात उच्च न्यायालयाने तब्बल १९ वर्षांनंतर दिलेला, सर्व १२ दोषींची निर्दोष सुटका करणारा सोमवारचा निकाल मात्र सगळ्यांनाच धक्का देऊन जाणारा आहे. या १२ दोषींपैकी एकाचा या कालावधीत मृत्यू झाला आहे. तर ११ जणांची या निकालामुळे मुक्तता होणार आहे. ११ जुलै २००६ रोजी माटुंगा रोड, माहीम जंक्शन, वांद्रे, सांताक्रूझ, जोगेश्वरी, बोरिवली आणि भाईंदर या सात ठिकाणी हे बॉम्बस्फोट झाले होते. सत्र न्यायालयाने या बॉम्बस्फोट खटल्यातील पाच दोषींना फाशीची तर सात दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. उच्च न्यायालयाने या सर्व १२ जणांची निर्दोष सुटका केली आहे तर मग १९ वर्षांपूर्वी बॉम्बस्फोटांच्या त्या मालिकेत १८९ जणांनी आपला जीव गमावला आणि ७००हून अधिक जण जखमी झाले, याला जबाबदार कोण होते? संध्याकाळी ६.२४ ते ६.४२ वाजताच्या दरम्यान हे बॉम्बस्फोट झाले होते. त्यावेळेत मुंबई उपनगरीय रेल्वेच्या गाड्यांमधील गर्दीची कल्पना आपण करू शकतो. किती जणांच्या आयुष्याला या दहशतवादी घटनेने कलाटणी दिली असेल? कुकरमध्ये ठेवलेल्या स्फोटकांचा वापर करून दहशतवाद्यांनी हे स्फोट घडवल्याचे सांगितले गेले होते. दहशतवादविरोधी पथकाने अर्थात एटीएसने तपास करून या आरोपींना ताब्यात घेत साक्षीपुरावे गोळा केले होते. यथावकाश सत्र न्यायालयाने सप्टेंबर २०१५मध्ये या १२ जणांना दोषी ठरवून त्यांच्यापैकी पाच जणांना फाशीची, तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. त्यानंतर दोषींनी शिक्षेविरोधात अपील केले तर राज्य सरकारने शिक्षेवर शिक्कामोर्तब होण्यासाठी याचिका केली, मात्र वेगवेगळ्या कारणांनी अंतिम सुनावणीच होऊ शकली नाही. आणि अखेर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने खटल्यातील ४४ हजारांहून अधिक कागदपत्रे व खूप मोठ्या प्रमाणातील पुराव्यांचा विचार करून दिलेला निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. उच्च न्यायालयाच्या या धक्कादायक निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाईलच, पण न्यायाकरिता मुंबईकरांनी आणखी किती काळ वाट पाहायची?**

# वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला विरोध का?

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग तालुक्यातील उसर परिसरात रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधण्यात येत आहे. २२ फेब्रुवारी २०२२ रोजी या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. तीन वर्षात काम पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र भूमिपूजन होऊन तीन वर्ष होत आले तरी वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे काम पूर्ण झाले नाही. या कामात अडथळे आणले जात आहे. स्थानिकांचा विरोध असल्याचे सांगून काम थांबवले जाता आहे. स्थानिकांना काम मिळाले पाहिजे ही मागणी रास्त आहे, मात्र वैद्यकीय महाविद्यालयाच विरोध करणे योग्य नाही. उलट हे वैद्यकीय महाविद्यालय लवकर सुरू होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. शेजारच्या जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांच्या इमारती पूर्ण होऊन तेथे वैद्यकीय महाविद्यालये सुरू झाली आहेत.

शासकीय अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेने अलिबाग येथे गेल्या वर्षीपासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास मंजुरी दिली. त्यानुसार आरसीएफच्या कुरूळ येथील वसाहतील तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. यंदा तिसऱ्या वर्षाचे प्रवेश सुरू होते, पण वैद्यकीय महाविद्यालयाचा इमारतीचे काम पूर्ण झाले नाही. विद्यार्थी संख्या दरवर्षी वाढणार आहे. त्यामुळे सध्याची व्यवस्था अपुरी पडणार आहे.

अलिबाग तालुक्यातील उसर येथील ५३ एकर जागा रायगड जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय आणि ५०० खाटांच्या रुग्णालयासाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे. या जागेवर वैद्यकीय महाविद्यालयाची प्रशासकीय इमारत आणि ५०० खाटांचे सर्वोपचार रुग्णालयाची इमारत बांधली जाणार आहे. यासाठी साडेचारशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तीन वर्षात हे कामे पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र भूमिपूजन होऊन तीन वर्ष होत आले तरी इमारत पूर्ण झाली नाही. स्थानिकांचा विरोध असल्यामुळे काम करता येत नाही असे शासकीय यंत्रणेकडून सांगण्यात येते.

हे रुग्णालय सुरू झाल्यानंतर रायगडातील जनतेला चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील. दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया मुंबई, पुण्यात जावे लागणार नाही. भविष्याचा रायगड जिल्ह्याचा विचार करता हे वैद्यकीय महाविद्यालय लवकर पूर्ण करून ते सुरू करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये चांगल्या आरोग्य सुविधा नाहीत. त्यामुळे या जिल्ह्यात चांगले रुग्णालय असावे अशी रायगडकरांची इच्छा होती. मागील काही वर्ष या रुग्णालयासाठी प्रयत्न केले जात होते. अलिबाग तालुक्यातील उसर येथे जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालय बांधण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली. १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० खाटांचे सर्वोपचार रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे.

या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी तब्बल ४०६ कोटी ९६ लाख ६८ हजार ३३६ रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

अलिबाग तालुक्यातील ऊसर येथील जवळपास ५२ एकर जमिनीवर हे रुग्णालय बांधण्यात येणार आहे. त्यातील ३५ एकर जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी वापरण्यात येईल. उर्वरित जागेत भविष्यात नर्सिंग कॉलेज तसेच इतर वैद्यकीय सुविधा उभारल्या जातील. सुरुवातीला या वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. भविष्यात ही क्षमता १५० वाढविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. सध्या अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात हे महाविद्यालय सुरू केले जाईल. तेथे ३०० खाटा आहेत. उसर येथील बांधकाम पूर्ण केले जाईल. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालय उसर येथे हलविण्यात येईल. तेथे ५०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय असेल.

रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागात चांगल्या आरोग्य सुविधा नाहीत. त्यामुळे दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया यासाठी मुंबई किंवा पुण्यात जावे लागते. उसर येथील वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णाला सुरू झाल्यावर चांगल्या आरोग्य सुविधा रायगडातील गरीब जनतेला मिळतील. त्यांना उपचारासाठी मुंबई किंवा पुण्यात जावे लागणार नाही. भविष्यात येथे चांगल्या आरोग्य सुविधा येतील. नर्सिंग कॉलेज सुरू होईल. मेडिकल टुरिझम निर्माण करता येईल. यातून येथील भूमिपुत्रांना, स्थानिकांनाही रोजगार मिळेल.

एकूणच या रुग्णालयामुळे सर्वसामान्यांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळतीलच, शिवाय प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारदेखील मिळणार आहे.

राज्य सरकारने निधी मंजूर केला आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारितील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने मंजुरी (आयएमसी) दिली आहे. त्यामुळे या वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामात तांत्रिक अडचणही नाही. तरीदेखील तीन वर्षात इमारत पूर्ण होत नाही हे योग्य नाही.

अलिबागचा इतिहास पाहता येथे येणाऱ्या प्रकल्पांना सुरुवातीला विरोधच केला जातो. त्यामुळे अनेक प्रकल्प रखडले. अलिबागशेजारी नर्सिंग कॉलेज बांध्याणत येणार होते, पण त्याला विरोध करण्यात आला. जिल्हा क्रीडा संकुलासारखा महत्त्वाचा प्रकल्प अजूनही पूर्ण होऊ शकलेला नाही. रेवस-करंजा पूल रखडला. तसे या वैद्यकीय महाविद्यालयाचे होणार नाही याची दक्षता घ्याला हवी.

हा प्रकल्प जनतेच्या आरोग्याशी निगडीत आहे. स्थानिकांचा विरोध असल्याचे सांगितले जाते, परंतु वस्तुस्तिती अशी नाही. काही लोकांना कामाचे ठेके हवेत. ते सर्वसामान्यांना भडकवून आपली पोळी भाजून घेतात. असे असले तरी स्थानिक ग्रामस्थांशी चर्चा करून यातून मार्ग काढला पाहिजे. स्थानिकांनी आपल्या रास्त मागण्यांसाठी लढावे, परंतु शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला सरसकट विरोध करू नये. वैद्यकीय महाविद्यालय लवकर सुरू होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले पाहिजेत.

# निसर्ग समृद्ध करून पर्यावरणाचे संवर्धन करूया...

*हिरवे हिरवे गार गालिचे*
*हरीत तृणांच्या मखमालीचे...*

पावसाळ्याच्या दिवसांत निसर्गसौंदर्याची होत असलेली मुक्त उधळण पाहताना आपोआप बालकवींच्या या ओळी आपल्या ओठी येतात. हिरवाईने नटलेला निसर्ग आपल्या सगळ्यांनाच हवाहवासा वाटतो, मात्र पावसाळ्याचे हे दिवस संपताच उघडे



बोडके डोंगर आणि भकास माळराने हे आपले वास्तव होऊन जाते. आपल्या ऐहिक सुखांच्या लालसेने आपण गेल्या काही वर्षांत निसर्ग वारेमाप पद्धतीने ओरबाडला आहे.

जागतिक तापमान वाढ, लहरी हवामान, बिघडलेले ऋतुचक्र हे सगळे आपण निसर्गाच्या केलेल्या नुकसानीचे परिणाम आहेत. हे जसं एका रात्रीत बिघडलेले नाही तसेच एका रात्रीत सुरळीतदेखील होणार नाहीये. त्यासाठी व्यापक आणि सातत्यपूर्ण प्रयत्नाची आवश्यकता आहे.

आपण उपभोगत असलेला निसर्गाचा हा वारसा आपल्याला पुढच्या पिढीला अधिक समृद्धपणे देण्यासाठी कृतिशील राहू. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन हे आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवू.


**-डॉ. अरुणकुमार भगत,**
**माजी नगरसेवक, कामोठे**



## बदलते तंत्रज्ञान

# वेगवान कामगिरी, सोयीमुळे डेस्कटॉपच्या मागणीत वाढ

एकोणीसशे नव्वदच्या दशकात खऱ्या अर्थाने डेस्कटॉप कॉम्प्युटरने कासवाच्या पावलांनी भारतात शिरकाव केला.



त्यानंतर २००० च्या दशकात हा संगणक कामकाजाचा अविभाज्य भाग बनला, मात्र २०१० नंतर आपला डेस्कटॉप संगणक आंकुचन पावला आणि त्याचे रूपडे लॅपटॉपचे झाले. अनेकांना मग डेस्कटॉप हा अडचण वाटू लागला. प्रवासात काम करणे सुलभ वाटू लागल्यामुळे लॅपटॉपच सोयीचा झाला.

जर डेस्कटॉपचा लॅपटॉप होऊ शकतो तर लॅपटॉपचा आकारही आणखी छोटा होऊ शकतो, असा विचार अभियंत्यांच्या मनात आला आणि त्यांनी मग त्यातून टॅब्लेट कॉम्प्युटर विकसित केले. त्याचदरम्यान क्वार्टी की-पॅड (फोनवरच वेगळा की-बोर्ड असलेला मोबाईल फोन) याने कात टाकली आणि स्मार्ट फोन बाजारात आला. मग तंत्रज्ञांच्या मनात विचार आला की, या स्मार्ट फोनलाच आणखी ताकद देत यालाच संगणकाची शक्ती दिली तर? ...आणि मग यातून जन्म झाला तो फॅब्लेटचा. फॅब्लेट म्हणजे फोन आणि टॅब्लेट यांचे मिश्रण. कदाचित फॅब्लेटचा पुढचा आविष्कारही लवकरच येईल, पण सध्या काळाचे एक चक्र पूर्ण झाले आहे आणि १९९०च्या दशकातील डेस्कटॉपची मागणी पुन्हा वाढत आहे.

अन्य संगणकाच्या तुलनेत डेस्कटॉपवर सुलभतेने काम करता येते. त्यातच आता वेगळा सीपीयू नसतो. ऑल इन वन युनिट येते. त्यामुळे जागा कमी लागते. अधिक वेगवान दर्जाचे मायक्रो बोर्ड, प्रोसेसर असल्याने हे संगणक अधिक वेगवान असतात.

१९७०च्या दशकामध्ये मुंबईमध्ये केवळ दोन संगणक होते. एक मुंबई आयआयटीमध्ये होता तर दुसरा बीएआरसीमध्ये. या दोन्ही संगणकांचा आकार एका खोलीएवढा होता. गेल्या ५५ वर्षांमध्ये खोलीएवढा संगणक ते फॅब्लेट अर्थात हाताच्या तळव्यावर मावणारा संगणक असा संगणक तंत्रज्ञानाचा प्रवास झाला आहे.

लॅपटॉपच्या मार्केटमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये ७ टक्क्यांची सातत्यपूर्ण वाढ दिसत आहे. वर्षाकाठी सरासरी १ कोटी ३० लाख लॅपटॉप विकले जातात. तसेच सेकंडहँड लॅपटॉपलाही उत्तम मागणी आहे.

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**निमित्त**

देवेंद्र गंगाधरराव फडणवीस हे एक भारतीय राजकारणी असून ते सध्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. आज त्यांचा वाढदिवस...

भारतीय जनता पक्षाकडून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. वयाच्या ४४व्या वर्षी ते महाराष्ट्राचे दुसरे सर्वांत तरुण मुख्यमंत्री झाले. फडणवीस हे महाराष्ट्र विधानसभेतील नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. भाजपकडून ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि वसंतराव नाईक यांच्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा संपूर्ण कार्यकाळ पूर्ण करणारे दुसरे मुख्यमंत्री होते.

देवेंद्र फडणवीस यांचा २२ जुलै १९७० जन्म नागपुरात झाला. त्यांचे वडील गंगाधर फडणवीस यांनी नागपूर येथून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम पाहिले. देवेंद्र फडणवीस यांनी इंदिरा कॉन्व्हेंटमधून प्रारंभिक शालेय शिक्षण घेतले. त्यांची आई सरिता फडणवीस, ज्या अमरावतीच्या काळोटी घराण्याची वंशज. त्या विदर्भ हौसिंग क्रेडिट सोसायटीच्या माजी संचालक होत्या.

आणीबाणीच्या वेळी देवेंद्र फडणवीस यांचे वडील जनसंघ सदस्य होते. त्यांना सरकारविरोधी निषेधात भाग घेण्यासाठी तुरुंगात टाकले गेले होते. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये शालेय शिक्षण सुरू ठेवण्यास नकार दिला. पंतप्रधानांच्या नावावर असलेल्या शाळेत जाण्याची इच्छा नव्हती, कारण त्यांनी आपल्या वडिलांना तुरूंगात डांबले होते. यानंतर त्यांनी सरस्वती विद्यालय शाळेत बदली केली, जिथे बहुतेक शालेय शिक्षण घेतले.

दहा वर्षे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर फडणवीस यांनी धरमपेठ कनिष्ठ महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. बारावी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी नागपूरच्या शासकीय लॉ कॉलेजमध्ये पाच वर्षांच्या इंटिग्रेटेड लॉ पदवीसाठी प्रवेश घेतला आणि १९९२मध्ये पदवी घेतली.

देवेंद्र फडणवीस यांचे अमृता फडणवीस यांच्याशी लग्न झाले असून त्यांना एक मुलगी दिविजा ही आहे.

फडणवीस यांनी राजकीय कारकीर्दीची सुरुवात नव्वदच्या दशकाच्या मध्यापासून केली. तेव्हापासून त्यांनी आपल्या राजकीय पक्षासाठी आणि निवडून आलेल्या प्रतिनिधी म्हणून अनेक नेतृत्व भूमिकांमध्ये काम केले. महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून, फडणवीस हे भाजप संलग्न अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी)चे सक्रिय सदस्य होते. त्यांनी राम नगर प्रभागातून प्रथम नगरपालिका निवडणूक जिंकली.

पाच वर्षांनंतर फडणवीस नागपूर महानगरपालिकेचे सर्वांत तरुण महापौर झाले आणि ते भारताच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचे नगराध्यक्ष झाले. १९९९पासून ते महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत नागपूरचे प्रतिनिधित्व करीत आहेत. ते सध्या राज्याचे मुख्यमंत्रीपद समर्थपणे भूषवित आहेत. अभ्यासू नेता अशी त्यांची ओळख आहे. वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व या तिन्ही पातळ्यांवर ते उजवे आहेत. त्याचबरोबर चौफेर संचार, दूरदर्शीपणा, संयमी व्यक्तिमत्व असे त्यांचे गुण आहेत. अशा या उमद्या नेत्याला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! **(साभार इंटरनेट)**

## बातमीतील बात







# आरोग्य प्रहर

## मटकी खाण्याचे जबरदस्त फायदे

आपल्या रोजच्या आहारात कडधान्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. यात ऋजुता दिवेकर यांच्यापासून ते रायन फर्नांडोपर्यंत अनेक सेलिब्रिटी आहारतज्ज्ञांनी कडधान्यांच्या सेवनाचे फायदे अधोरेखित केले आहेत. यातीलच एक सुपरफूड म्हणजे मटकी. महाराष्ट्र आणि आसपासच्या प्रदेशात मटकीचे पिक घेतले जाते.



प्रोटिन्सने भरलेल्या मटकी खाण्याचे आरोग्यासही भरपूर फायदे आहेत. यावर बंगळुरू येथील एस्टर सीएमआय हॉस्पिटलच्या क्लिनिकल न्यूट्रिशन अँड डायटेटिक्सच्या सर्व्हिसेसप्रमुख एडविना राज म्हणाल्या की, मटकी ही एक लहान तपकिरी शेंग आहे, जी फायबर आणि मॅग्नेशियम आणि पोटॅशियमसारख्या आवश्यक खनिजांनी भरलेली असते.

मटकी बॅड कोलेस्ट्रॉल कमी करून रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करते. यासह रक्तदाब नियंत्रित करून हृदयाच्या आरोग्यासही फायदेशीर असते. त्यातील हाय फायबर रक्तवाहिन्या निरोगी ठेवते आणि पचनक्रिया सुधारते, यामुळे हृदयविकाराचा धोका कमी करण्यासही मदत होते, असे एडविना राज म्हणाल्या.

नवी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयाच्या मुख्य आहारतज्ज्ञ प्रतीक्षा कदम म्हणाल्या की, मटकीत फायबर, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि फोलेट व्यतिरिक्त हाय फायबर असते. यातील पोटॅशियम रक्तदाब नियंत्रणात ठेवत एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करते, यासह हृदयविकाराचा धोकादेखील कमी होतो. मटकीतील अँटीऑक्सिडंट गुणधर्म ऑक्सिडेटिव्ह ताण, जळजळ कमी करत हृदयाचे कार्य सुधारते.

राज यांनी नमूद केले की, मटकीचे सेवन बहुतेक लोकांसाठी सुरक्षित आहे, ज्यामध्ये मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या लोकांचाही समावेश आहे, पण मूत्रपिंड किंवा गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्या असलेल्या लोकांनी मटकीचे सेवन करताना आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

पचन आणि पोषक तत्वांचे शोषण वाढविण्यासाठी मटकी शिजवण्यापूर्वी भिजवून मोड आणून घ्यावी. सॅलेड, भाजी किंवा इतर प्रकारे रोजच्या आहारात मोड आलेल्या मटकीचा समावेश करू शकता. यामुळे हृदयाचे आरोग्य निरोगी राहिल.

# माणगावमधील वर्दळीच्या कचेरी रोडवर खड्डे

**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील संवेदनशील आणि नित्य वर्दळीचा सर्वदूर परिचित कचेरीरोड, माणगांवकरच नाही तर तालुका, जिल्हाभरातून शासकीय, शैक्षणिक कामानिमित्त शालेय विद्यार्थी, महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, शिक्षित सुज्ञ शासन अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक सर्वांच्या रहदारीच्या या रस्त्याच्या दुरवस्थेला सुरुवात झाली, वेळीच रस्त्याचे ठिगळ दुरुस्त केले नाही तर येथे भगदाड पडण्याची शक्यता आहे.

मोक्याचे ठिकाण नाक्यावर धोकादायक खड्डे पडलेत. त्यात भर महामार्ग वाहतुक कोंडी, परिणामी येथे वळविलेली जड अवजड वाहनांच्या वर्दळीने रस्ता खराब होत आहे.



## जाहीर नोटीस

माझे अशिल १) श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर वय सज्ञान, व्यवसाय बांधकाम व्यावसायिक व) श्री. कुणाल मनिष शाह, वय–सज्ञान, व्यवसाय बांधकाम व्यावसायिक, कार्यालय ३ शॉप नं. ५, प्लॉट नं. ४९, लक्ष्मणशेट प्लाझा, से. ५, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड, यांच्या वतीने सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या जमिनीचे मालक १) सौ. संगिता दिलीप वास्कर, २) सौ. सुप्रिया विकास पाटील, ३) श्री.ऋषिकेश दिलीप वास्कर व ४) श्री. मयुरेश दिलीप वास्कर, सर्व–सज्ञान, राहणार : मौजे कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि. रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन आहे.

**जमिन (मिळकतीचे ) वर्णन**

| अ. क्र. | गट नं. | ठिकाण | क्षेत्र हे–आर–पॉ. | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४३ | मौजे मोसारे तलाठी सजा मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड | ०–५६–९० | १२ = ८१ |

या वर्णनाची जमिन माझे अशिल **''खरेदी विक्रीच्या करारनाम्यानुसार''** कायमस्वरूपी खरेदी करीत आहेत. तरीही याबाबत कोणाही व्यक्ती व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील जमिनीसंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या जमिनीच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर जमिनीच्या खरेदी विक्री बाबतचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०७/२०२५

**सही/–**
**श्री. निरंत वासुदेव पाटील**
(ॲडव्होकेट)
कार्यालय : तळमजला, प्लॉट नं. बी–४०,
से. २०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळगाव, नवी मुंबई. ७०६.
फो. नं. ९३२४५६९८०६

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५–२६ ते २०२९–३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. २२/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव : **ग्रीनवुड इस्टेट फेज १ गृहनिर्माण संस्था मर्यादित हेदूटणे, ता. पनवेल, जि. रायगड.** सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २३/०७/२०२५ ते २८/०७/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक २९/०७/२०२५, नामनिर्देशन माघारी दि. ३१/०७/२०२५ ते १४/०८/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २४/०८/२०२५ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, **संस्था कार्यालय :– ग्रीनवुड इस्टेट फेज १ गृहनिर्माण संस्था मर्यादित हेदूटणे, ता. पनवेल, जि. रायगड.** कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०७/२०२५

**सही/–**
**संदेश नंदकुमार महाडीक**
निवडणूक निर्णय अधिकारी
प्राधिकृत अधिकारी, कोकण विभाग पॅनल
अ.क्र. वर्ग 'क' ०६/ 'ई' ०९ ग्रीनवुड
इस्टेट फेज १ गृहनिर्माण संस्था
मर्यादित हेदूटणे, ता. पनवेल, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर सूचना देण्यात येते की, श्री. शांताराम मारुती दाभणे व श्री. शरद रामचंद्र दाभणे यांच्या मालकीचे प्रत्यक्ष ताबेकब्जातील मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद शेतजमिन मिळकतीमधील श्री. शांताराम मारुती दाभणे यांच्याकडून २० गुंठे व श्री. शरद रामचंद्र दाभणे यांच्याकडून ६१.३ गुंठे क्षेत्र शेतजमिन आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेणार आहेत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड**

| गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४ | १ | १–४६–५० पो.ख. ०–०७–०० **एकूण क्षेत्रफळ १–५४–६०** पैकी श्री. शांताराम मारुती दाभणे यांची २० गुंठे व श्री. शरद रामचंद्र दाभणे यांची ६१.३ गुंठे | १४.८७ |

तरी सदरहू मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपाआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखीपुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

दिनांक : २१/०७/२०२५
ठिकाण : पनवेल

**सही/–**
**आनंद वाय. धोंगडे**
ॲडव्होकेट
१०३, ए विंग, निल रिद्धी एमरलॅण्ड, प्लॉट नं. ५२७, तहसील ऑफिस जवळ, पनवेल मोबाईल नं. ७५०६४९८५०३

## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत हे खालील बाबींकरीता बाजारभाव / दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नाव –** पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२५–२६ माझी वसुंधरा अभियान ६.० राबविणेसाठी त्रयस्थ संस्थेची नेमणूक करणेबाबत.

नोंदणीकृत आणि अनुभवी संस्थांकडून पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२५–२६ माझी वसुंधरा अभियान ६.० राबविणे त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेकामी पनवेल महानगरपालिकेमार्फत बाजारभाव / दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | दर (GST व सर्व करांसह) |
|---|---|---|
| १ | – माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत निर्धारित ७ घटकांवर आधारित कार्यान्वयीन योजना तयार करणे.<br>– माझी वसुंधरा अभियान ६.० अभियानाशी संबंधित सर्व विभागांकडील (उदा. विद्युत, बांधकाम, नगररचना, घनकचरा व्यवस्थापन, उद्यान, पाणी पुरवठा विभाग) निर्धारित ७ घटकांवर आधारित माहिती संकलित करणे.<br>–माझी वसुंधरा पोर्टलवर संकलित माहिती विहित नमुन्यात भरून वेळेत माहिती अद्ययावत करणे.<br>–पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन तसेच जिल्हा प्रशासनाच्या सूचनांनुसार माझी वसुंधरा अभियान ६.० अभियानाशी संबंधित उपक्रम आणि मोहीम याबाबत कार्यवाही करणे.<br>–अभियान प्रगतीबाबत प्रगती अहवाल व नियमित स्वरूपात सादरीकरणे तयार करणे व पर्यावरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यां समोर मांडणी करणे.<br>– अभियानातील उद्दिष्टांची पूर्तता व प्रभाव याचे मूल्यांकन करणे.<br>– वार्षिक सर्वेक्षणाची अंमलबजावणी व विश्लेषण करणे. | |

सदरचे बाजारभाव/दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक २९/०७/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागांत सादर करावीत.

दिनांक : २१/०७/२०२५

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३३६/३४६/२०२५

**सही/–**
उपायुक्त (पर्यावरण) पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस
### उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

on admission आरटीएस अपिल क्र. ..........

कै. सोमा धर्मा कामोठकर (मयत) वारस.
१. कै. तुकाराम सोमा कामोठकर (मयत) वारस, १/१. श्री रामचंद्र तुकाराम कामोठकर (पाटील)
१/२. श्री लक्ष्मण तुकाराम कामोठकर, १/३. श्री जयवंत तुकाराम कामोठकर,
१/४ श्री राजाराम तुकाराम कामोठकर, १/५. श्री बळीराम तुकाराम कामोठकर,
१/६. कै. हरिश्चंद्र तुकाराम कामोठकर (मयत) वारस, १/६/१. श्रीम. देविना हरिश्चंद्र कामोठकर.
१/६/२. श्रीम. सरिता कमलाकर पाटील, १/६/३. श्रीम. शैला नरेश भोईर,.
१/७ . कै. हौशिराम तुकाराम कामोठकर (मयत) वारस १/७/१. श्रीम. विमल हौशिराम कामोठकर,
१/७/२ श्री. अतुल हौशिराम कामोठकर, १/७/३. श्री. अंकेश हौशिराम कामोठकर.
२. कै. धनाजी सोमा कामोठकर (मयत) वारस, २/१. श्री. मानाजी धनाजी कामोठकर,
२/२. श्री. धर्मा धनाजी कामोठकर, २/३. श्रीम. भारती रविंद्र पाटील.
३. कै. जाना सोमा कामोठकर (मयत) वारस, ३/१. श्रीम. गिरीजाबाई जाना कामोठकर,
३/२. श्री. पंढरीनाथ जाना कामोठकर, ३/३. श्री. यादव जाना कामोठकर,
३/४ . श्री. कृष्णा जाना कामोठकर, ३/५. श्रीम. मंजुला कमलाकर पाटील
३/६. श्रीम. विठाबाई बाळकृष्ण भोपी,
वरील सर्व राहणार मु. पो. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
३/७. श्रीम. हिंदा रतन कासकर,
रा. मु. पो. दिघोडे ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
३/८. श्रीम. निरंजना चंद्रकांत पाटील,
रा. मु. डुंगी, पो. पारगाव ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
३/९. कै. अंबीबाई हिराजी पाटील (मयत) वारस,
३/९/१. श्री. यशवंत हिराजी पाटील, ३/९/२. श्री. अनंत हिराजी पाटील,
३/९/३. श्री. भरत हिराजी पाटील,
वरील सर्व राहणार मु. पो. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६ .............................. **वादी**

**विरुध्द**

कै. पोश्या धर्मा कामोठकर (मयत) वारस, १. कै. प्रकाश पोशा कामोठकर (मयत) वारस,
१/१. श्रीम. चांगीबाई प्रकाश कामोठकर १/२. श्री. घनःश्याम प्रकाश कामोठेकर,
१/३ श्रीम. प्रतिभा मनिलाल पाटील, १/४ श्रीम. मंदा प्रदिप गोवारी,
१/५. श्रीम. मिना जितेंद्र पाटील, २. श्रीम. महादीबाई मधुकर पंडीत,
३. श्रीम. गंगुबाई रामचंद्र जोशी, ४. कै. एकादशी नामदेव पाटील (मयत) वारस,
४/१. श्री. शशिकांत नामदेव पाटील, ४/२. श्री. गणेश नामदेव पाटील
४/३. श्रीम. शशिकला नामदेव पाटील,
वरील सर्व राहणार मु. पो. मोठी जुई ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
५. कै. चाया सोमा कामोठकर (मयत) तर्फे वारस, ५/१. कै. जोगा चाया कामोठकर (मयत) तर्फे वारस
५/१/१. श्रीम. हासुबाई जोगा कामोठकर, ५/१/२ श्री. विजय जोमा कामोठकर
५/१/३. श्री. नंदीनी विलास पाटील,
५/१/४. कै. हेमचंद्र जोगा कामोठकर (मयत) तर्फे वारस
५/१/४/१, श्रीम. भाविका हेमचंद्र कामोठकर, ५/१/१/२ वृतज्ञ हेमचंद्र कामोठकर
५/२. श्री. अरुण चाया कामोठकर, ५/३. कै. भिमा तुकाराम पाटील (मयत) तर्फे वारस
५/३/१. श्रीम. कुंदा मोतीराम पाटील, ५/३/२. श्रीम. पार्वती अनंत कासकर
५/३/३. श्रीम. भारती प्रभाकर पाटील,
५/३/४ . कै. अनंत तुकाराम पाटील (मयत) तर्फे वारस
५/३/४/१ . श्री. राम अनंत पाटील, ५/३/४/२. श्री. सुनिल अनंत पाटील
वरील सर्व राहणार, मु. पो. मोठी जुई ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६ .
५/३/४/३. श्रीम. लतिका चिमणे
रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड.
५/४. श्रीम. काशी श्रीपत चिमणे,
रा. कामोठे ता. पनवेल, जि. रायगड. ................................................................ **प्रतिवादी**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे –मोठी जुई ता.उरण,जि.रायगड येथिल फेरफार नोंद क्र. १०३१ अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूत अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणी सामनेवाले या न्यायालयात सुनावणी कामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक **२४/०७/२०२५** रोजी सकाळी ११:०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवालेयांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे– जुई, ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १४६ | ४ | ०.०७.३० | ०.८९ |
| १५४ | ० | १.३४.६० | ७.६२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :– पनवेल.
दिनांक :–१४/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
उपविभाग पनवेल

## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### ऑफलाईन निविदा सूचना

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ऑफलाईन निविदा ब–१ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (GST सह) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत पनवेल महानगरपालिका हद्दीतील झाडे तोडणी/पुनर्रोपण व फांद्या छाटणी परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज प्रणाली विकसित करणे. | ९,९०,०००/– | २,०००/– | ५००/– मात्र |

१. या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक. २२/०७/२०२५ पासून दि.२८/०७/२०२५ पर्यत दुपारी ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) पनवेल महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागात उपलब्ध होतील.
२. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.
३. सीलबंद निविदा दिनांक. २८/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागात स्विकारण्यात येतील.
४. प्राप्त झालेल्या निविदा शक्य असेल तर दि. २९/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० नंतर उपायुक्त वृक्ष प्राधिकरण विभाग यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
५. प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

दिनांक : २१/०७/२०२५

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३३८/३४८/२०२५

**सही/–**
**(कैलास गावडे)**
अतिरीक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस
### उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

on admission आरटीएस अपिल क्र. ..........

कै. सोमा धर्मा कामोठकर (मयत) वारस.
१. कै. तुकाराम सोमा कामोठकर (मयत) वारस, १/१. श्री रामचंद्र तुकाराम कामोठकर (पाटील)
१/२. श्री लक्ष्मण तुकाराम कामोठकर, १/३. श्री जयवंत तुकाराम कामोठकर,
१/४ श्री राजाराम तुकाराम कामोठकर, १/५. श्री बळीराम तुकाराम कामोठकर,
१/६. कै. हरिश्चंद्र तुकाराम कामोठकर (मयत) वारस, १/६/१. श्रीम. देविना हरिश्चंद्र कामोठकर.
१/६/२. श्रीम. सरिता कमलाकर पाटील, १/६/३. श्रीम. शैला नरेश भोईर,.
१/७ . कै. हौशिराम तुकाराम कामोठकर (मयत) वारस १/७/१. श्रीम. विमल हौशिराम कामोठकर,
१/७/२ श्री. अतुल हौशिराम कामोठकर, १/७/३. श्री. अंकेश हौशिराम कामोठकर.
२. कै. धनाजी सोमा कामोठकर (मयत) वारस, २/१. श्री. मानाजी धनाजी कामोठकर,
२/२. श्री. धर्मा धनाजी कामोठकर, २/३. श्रीम. भारती रविंद्र पाटील.
३. कै. जाना सोमा कामोठकर (मयत) वारस, ३/१. श्रीम. गिरीजाबाई जाना कामोठकर,
३/२. श्री. पंढरीनाथ जाना कामोठकर, ३/३. श्री. यादव जाना कामोठकर,
३/४ . श्री. कृष्णा जाना कामोठकर, ३/५. श्रीम. मंजुला कमलाकर पाटील
३/६. श्रीम. विठाबाई बाळकृष्ण भोपी,
वरील सर्व राहणार मु. पो. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
३/७. श्रीम. हिंदा रतन कासकर,
रा. मु. पो. दिघोडे ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
३/८. श्रीम. निरंजना चंद्रकांत पाटील,
रा. मु. डुंगी, पो. पारगाव ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
३/९. कै. अंबीबाई हिराजी पाटील (मयत) वारस,
३/९/१. श्री. यशवंत हिराजी पाटील, ३/९/२. श्री. अनंत हिराजी पाटील,
३/९/३. श्री. भरत हिराजी पाटील,
वरील सर्व राहणार मु. पो. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६ .............................. **वादी**

**विरुध्द**

कै. पोश्या धर्मा कामोठकर (मयत) वारस, १. कै. प्रकाश पोशा कामोठकर (मयत) वारस,
१/१. श्रीम. चांगीबाई प्रकाश कामोठकर १/२. श्री. घनःश्याम प्रकाश कामोठेकर,
१/३ श्रीम. प्रतिभा मनिलाल पाटील, १/४ श्रीम. मंदा प्रदिप गोवारी,
१/५. श्रीम. मिना जितेंद्र पाटील, २. श्रीम. महादीबाई मधुकर पंडीत,
३. श्रीम. गंगुबाई रामचंद्र जोशी, ४. कै. एकादशी नामदेव पाटील (मयत) वारस,
४/१. श्री. शशिकांत नामदेव पाटील, ४/२. श्री. गणेश नामदेव पाटील
४/३. श्रीम. शशिकला नामदेव पाटील,
वरील सर्व राहणार मु. पो. मोठी जुई ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६.
५. कै. चाया सोमा कामोठकर (मयत) तर्फे वारस, ५/१. कै. जोगा चाया कामोठकर (मयत) तर्फे वारस
५/१/१. श्रीम. हासुबाई जोगा कामोठकर, ५/१/२ श्री. विजय जोमा कामोठकर
५/१/३. श्री. नंदीनी विलास पाटील,
५/१/४. कै. हेमचंद्र जोगा कामोठकर (मयत) तर्फे वारस
५/१/४/१, श्रीम. भाविका हेमचंद्र कामोठकर, ५/१/१/२ वृतज्ञ हेमचंद्र कामोठकर
५/२. श्री. अरुण चाया कामोठकर, ५/३. कै. भिमा तुकाराम पाटील (मयत) तर्फे वारस
५/३/१. श्रीम. कुंदा मोतीराम पाटील, ५/३/२. श्रीम. पार्वती अनंत कासकर
५/३/३. श्रीम. भारती प्रभाकर पाटील,
५/३/४ . कै. अनंत तुकाराम पाटील (मयत) तर्फे वारस
५/३/४/१ . श्री. राम अनंत पाटील, ५/३/४/२. श्री. सुनिल अनंत पाटील
वरील सर्व राहणार, मु. पो. मोठी जुई ता. उरण, जि. रायगड. ४१०२०६ .
५/३/४/३. श्रीम. लतिका चिमणे
रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड.
५/४. श्रीम. काशी श्रीपत चिमणे,
रा. कामोठे ता. पनवेल, जि. रायगड. ................................................................ **प्रतिवादी**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे–मोठी जुई ता.उरण,जि.रायगड येथिल फेरफार नोंद क्र. २१५८ अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणी कामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणी कामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक **२४/०७/२०२५** रोजी सकाळी ११:०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे– जुई, ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ३ | १३ | ०.०१.०० | ०.०९ |
| ५ | २ | ०.०५.७० | ०.१६ |
| ५ | ८ | ०.०३.०० | ०.०९ |
| ८ | ४९ | ०.०७.०० | ०.१२ |
| ८ | ५६ | ०.०७.०० | ०.१२ |
| ८ | ५९ | ०.२९.०० | ०.५१ |
| ३० | ६ | ०.०२.८० | ०.४१ |
| ३२ | ६ | ०.०३.३० | ०.५३ |
| ३२ | १० | ०.०२.५० | ०.४१ |
| ७३ | २ | ०.०४.०० | ०.०९ |
| ७७ | १ड | ०.००.८० | ०.०० |
| ७८ | २ | ०.१०.५० | १.४४ |
| ८८ | ९ | ०.०७.४० | १.३८ |
| ८८ | २० | ०.०३.५० | ०.७३ |
| ८९ | ७ब | ०.०६.३० | ०.७८ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :– पनवेल.
दिनांक :–१४/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
उपविभाग पनवेल

# नवी मुंबईच्या वेशीवर रिक्षाचालकांकडून लूट

## पाच रुपयांची मनमानी भाडेवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे व नवी मुंबईच्या वेशीवरील दिघा विभागातून ठाण्याकडे जाणार्या मुकूंद कंपनी ते ईश्वरनगर मार्गी अनंतनगर आणि मुकूंद कंपनी ते वाघोबानगर येथे जाणाऱ्या काही रिक्षाचालकांनी मागील आठवडाभरापासून मनमानीपणे दोन्ही प्रवासी भाडयात पाच पाच रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे अवघ्या अर्धा किलो मीटर प्रवाशांसाठी शेअर रिक्षा चालकांकडून प्रति प्रवासी ५ रुपये अधिक आकारुन लुटमार सुरू आहे.

विशेष म्हणजे ही भाडेवाढ डिझेल, पेट्रोल आणि सीएनजीचे दरवाढ केल्यामुळे नाही तर पाच प्रवासी नेत असताना आरटीओने केलेल्या कारवाईनंतर करण्यात आली आहे. या ठिकाणच्या नागरिकांची मागील अनेक वर्षापासून मीटरने रिक्षा सुरू करण्याची मागणी रिक्षा स्थानिक धुडकावून लावली आहे. शेअर रिक्षा चालकांच्या मगरुळीमुळे रात्रीच्या वेळीदेखील नागरिकांना मीटरच्या उपलब्ध होत नसल्याने पोलिसांनी लक्ष द्यावे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.



नमुंमपाच्या हद्दतील प्रभाग-१ व २ कडे मार्गावरून मुकूंद कंपनी ते ठाण्यातील कळवा पुर्व परिसरातील अनंतनगर व वाघोबानगर येथे शेअर रिक्षा चालविल्या जातात. मागील अनेक वर्षांपासून जुनाट आणि भंगार अवस्थेतील रिक्षा या मार्गावर धावतात. तर रिक्षा चालकांकडे लायसन, रिक्षाची कागदपत्रे नसतानाही अनेक रिक्षा बिनधाकपणे पाच-पाच प्रवासी घेतात. पाच-पाच प्रवासी घेऊन रिक्षा चालकांकडून मागील अनेक वर्षांपासून नियमबाह्य पध्दतीने वाहतूक सुरू असताना जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवडयापासून आरटीओ आणि वाहतूक शाखेची परवानगी न घेता रिक्षा चालकांनी मनमानीपणे मुकुंद ते अनंतनगर १० ऐवजी १५ रुपये, मुकूंद ते वाघोबानगर दुर्गा मंदिर १५ वरुन २० रुपये केले आहे. रिक्षा चालकांनी मनमानीपणे भाडे वाढ केली असली तरी नियमाने तीन ऐवजी चार ते पाच प्रवासी घेणे सुरुच आहे. त्यामुळे अवघ्या एक किलोमीटरच्या अंतरासाठी प्रवाशांना ज्यादा पैसे मोजावे लागत आहे.

### पोलिसांवर खापर

जुलै महिन्यात रिक्षाचालकांनी टप्प्याटप्प्याने प्रवासी भाडयात वाढ केली आहे, मात्र ही वाढ करीत असताना आरटीओ व वाहतूक पोलिसांनी पाच प्रवासी वाहतूक करण्यात येत असल्याने कारवाई केल्याचा आरोप रिक्षाचालकांनी करीत भाडे वाढीचे कारण चक्क पोलिसांवर फोडले आहे.

दरम्यान, मुकूंद कंपनी ते वाघोबानगर या मार्गावर आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांनी कोणतीही परवानगू नसताना स्थानिक राजकीय नेत्यांना हाताशी धरुन नियमबाहय पध्दतीने जागोजागी शिक्षा स्टॅण्ड उभारण्यात आले आहेत. त्यावर कारवाई करावी, शेअर रिक्षा ऐवजी या ठिकाणी मीटरच्या रिक्षा सुरु कराव्यात, रिक्षा चालकांना गणवेश सक्तीचा करावा, ज्या रिक्षांकडे भंगार अवस्था आहे. त्यांच्यावर कारवाई करावी, लायसेन्स व कागदपत्रांची पुर्तता नसलेल्या रिक्षा तातडीने जप्त कराव्यात, तीन पेक्षा अधिक प्रवासी नेणार्या रिक्षांवर कारवाई करावी, अशी मागणी आरटी व वाहतूक पोली ठाणे आणि नवी मुंबई विभाग यांच्याकडे स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी केली आहे.

# स्वच्छताकर्मींसाठी योग आणि व्यसनमुक्ती शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली सेक्टर ३ येथील विभाग कार्यालयाजवळील समाजमंदिरात स्वच्छतादूत योग शिबीराच्या स्वरूपात आयोजित करण्यात आला होता.

ईएचएस शिक्षा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून आयोजित या योग शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऐरोली विभागातील स्वच्छतामित्र आणि स्वच्छतासखी यांनी घेतला. योग अभ्यासक गव्हाणेसर यांनी मानसिक ताण-तणाव व योगचिकित्सा याची सांगड घालत दररोजच्या जीवनातील योगाभ्यासाचे महत्व सांगून सोपे योगप्रकार करून घेतले व आरोग्य जपणुकीच्या दृष्टीने दररोज थोडा वेळ काढून ते नियमितपणे करण्यास सांगितले.



अशाच प्रकारे बेलापूर विभागात स्वच्छताकर्मींसाठी व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोणत्याही व्यसनामुळे स्वत:च्या आरोग्याची हानी होते तसेच कुटुंबाची वाताहत होते असे अनेक उदाहरणे सांगत, पटवून देत स्वच्छताकर्मींमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. या वेळी सर्वोदय स्मॉल फायनान्स बँक यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) स्वच्छताकर्मींना पावसाळी रेनकोटचे वितरण करण्यात आले. या वेळी सुभाष गवारीकर, जगदीश खेरोडकर, भगवान पाटील, अभिषेक कल्याणी, प्रसाद साखरकर, त्रिशा दुवा आदी मान्यवर उपस्थित होते.

नेरूळ विभागात डॉ.डी. वाय. पाटील स्टेडिअम समोरील सेवा रस्त्यावर सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये स्टर्लिंग महाविद्यालयाचे एनसीसी युनीटमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी उत्साहाने सहभागी झाले होते. या वेळी तेथील ट्री बेल्टमध्ये देशी वृक्षरोपांची योग्य ठिकाणी लागवड करण्यात आली.

वाशी येथील मिनी सी शोअर परिसरातही सखोल स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आले. स्वच्छताकर्मींनी यामध्ये मोठे योगदान दिले.

सर्व विभागांमध्ये विविध वयोगटातील नागरिकांचा सहभाग घेऊन नानाविध उपक्रमांचे उत्साहाने आयोजन केले जात आहे.

# कळंबोलीत आढळले बेवारस प्रेत

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीमधील बीमा कॉम्प्लेक्स जवळील पनवेल मुंब्रा महामार्गावर ब्रिज खाली एक ५० ते ५५ बेवारस स्थितीत अवस्थेत एक व्यक्ती आढळून आला आहे. या व्यक्तीला कळंबोली पोलिसांनी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. या व्यक्तीची कोणतीही ओळख नसल्याने कळंबोली पोलिसांनी या मृत व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पोलीस ठाण्याची संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

मृत व्यक्तीच्या नातेवाईकांच्या शोधात कळंबोली पोलीस आहेत. मृत्यू झालेल्या व्यक्तीचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे असून १६ जुलै रोजी तो मृत झाला असावा असा अंदाज डॉक्टरांनी वर्तवला आहे. मृत झालेला व्यक्ती हा शरीराने जीर्ण झाला असून रंग सावळा व हातापायाच्या काड्या झालेल्या आहेत. त्याची दाढी व केस वाढलेले आहेत. त्याने काळया रंगाची ट्रॅक पॅन्ट व ट्रॅक पॅन्टला बाहेरील बाजूस पिवळ्या रंगाच्या पट्ट्या आहेत. तसेच अंगात फुल बाहयांचा पांढऱ्या रंगाचा मळकट टी-शर्ट घातलेला आहे. बेवारस स्थितीत सापडलेल्या व्यक्तीकडे कोणताही पुरावा नसल्याने त्याच्या नातेवाईकांच्या शोधात कळंबोली पोलीस आहेत. या व्यक्तीबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास कळंबोली पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक नागेश शिरसकर यांच्याशी दूरध्वनी क्रमांक २७४५३००० या क्रमांकावर संपर्क साधून माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिक्षक संघटनेची राज्य कार्यकारिणी जाहीर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट पुरोगामी शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा संघटनेचे राज्य अध्यक्ष भानुदास तुरुकमाने सर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेमध्ये संघटनेची राज्य कार्यकारणी बदलाचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

नवीन राज्य अध्यक्ष म्हणून अरुण खांबलकर यांची बहुमताने निवड करण्यात आली. राज्य सरचिटणीसपदी मनोज महाजन यांची बहुमताने निवड करण्यात आली. सल्लागारपदी भानुदास तुरुकमाने यांची निवड करण्यात आली.

उपस्थित सर्व सभासदांनी नवनियुक्त अध्यक्ष, सरचिटणीस यांना शुभेच्छा देऊन, संघटनेचे कार्य व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रश्न तन मन लाऊन सोडवावे ही अपेक्षा व्यक्त केली. सदर सभेस संघटनेचे राजेश मदने, धनगर सर, शर्मा, विशे, उगळमोगले, कोळपे सर, भोसले सर, भेरे, चौधरी, वाघमारे उपस्थित होते.

# 'अंनिस'ची शाळांमध्ये जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रबाळेच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालय शाळा क्रमांक १०६ सेक्टर ५ कोपरखैरणे येथे चमत्कारा मागील विज्ञान प्रयोगांचा सादरीकरण केले. अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते मनोहर तांडेल व बेलापूरच्या प्रधान सचिव ज्योती क्षीरसागर यांनी ही प्रात्यक्षिक करून दाखवले.

त्यांनी पाण्याने दिवा पेटवणे, गडूतून तीर्थाचे पाणी काढणे, पलीता पेटवून शरीरावर फिरवणे, जळता कापूर हातात आणि तोंडात घेणे, पत्त्याचे पान ओळखणे असे प्रयोग विद्यार्थी समोर करून दाखवले. त्यामागील विज्ञान प्रात्यक्षिकासह पुन्हा करून दाखवले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. एकूण १५० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. कार्यक्रमाचा शेवट 'बुद्ध कबीर भीमराव फुले या भूमीवर जन्मले' या गीताने



नवी मुंबई जिल्हा प्रधान सचिव प्रा अमोलकुमार वाघमारे यांनी केला त्यास मुलानी उत्तम प्रतिसाद दिला. स्वागत व प्रास्ताविक दुर्गेश शिरसाट यांनी केले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक कृष्णा पंडागळे, दिलीप मिश्रा, सीमा खैरे,बोटे उपस्थित होत्या आभार रबाळे शाखा कार्याध्यक्ष अविनाश जाधव यांनी मानले कार्यक्रमास बेलापूर शाखा कार्याध्यक्ष महेंद्र राऊत आदी उपस्थित होते.

# सिडकोकडून ग्रामस्थांना नुकसानभरपाई अदा

**पनवेल : वार्ताहर**

ग्रामस्थांच्या नुकसानीपोटी ११३ कुटुंबियांना सिडकोतर्फे धनादेशाचे वाटप करण्यात आले. खासदार श्रीरंग बारणे यांच्या सूचनेनुसार व पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांच्या प्रयत्नाने करण्यात आले.



मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या सूचनेनुसार सिडको नवी मुंबई यांना सुचित करण्यात आले होते. त्यानुसार पारगाव डुंगी या गावाला तहसीलदार विजय पाटील यांच्या प्रयत्नानुसार तसेच सदस्य जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती दिशा तथा पारगावच्या माजी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांच्या पाठपुराव्याला यश येऊन मौजे दूंगी येथे धनादेशाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षी पावसाळयात पुराच्या पाण्यामुळे ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात बांधकामाचे तसेच सामानाचे नुकसान होत आहे. चार महिन्याचे स्थलांतरा होण्यासाठी या नुकसानापोटी सिडको महामंडळ तर्फे ग्रामस्थांना चार महिन्याच्या स्थलांतरिता होण्यासाठी घर बऱ्यापोटी ५० हजार रुपये दिले जातात. धनादेश तहसीलदार पनवेल यांच्या कार्यालयामार्फत ग्रामपंचायत पारगाव येथे ११३ कुटुंबाना वाटप करण्यात आले.

या वेळी प्रशासकीय अधिकारी संतोष ठोंबरे, ग्रामसेविका वानखेडे, माजी उपसरपंच निशा पाटील, मनोज दळवी, तलाठी क्षमा पवार, बाळासाहेब नाईक, प्रमोद नाईक, पोलीस पाटील श्रीधर पाटील व ग्रामपंचायत कार्यालयातील क्लार्क प्रमोद म्हात्रे उपस्थित होते.

# खारघर येथे उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका उद्यान विभाग आणि कॉज ट्रॅव्हलर्स सोशल वेल्फेअर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच खारघर येथे वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमांतर्गत सेक्टर २७, खारघर येथे अमलतास आणि कांचन अशा २६ वृक्षांचे रोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमाला कॉज ट्रॅव्हलर्स सोशल वेल्फेअर संस्थेचे अध्यक्ष भाल शेखर चिलाना, बँक ऑफ इंडिया सेक्टर ३५ खारघर शाखा व्यवस्थापिका रोहिणी राठोड तसेच खारघर येथील वृक्षारोपणाच्या मोहिमेमध्ये नेहमी पुढाकार घेत असलेल्या समाजसेविका छाया तारळेकर उपस्थित होत्या.

सहा. आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, रुपेश चित्रुक सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक वैभव ठाकरे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# उरणमध्ये वनविभागाला सर्पजागृतीपर मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक सर्पदिनानिमित्त उरण वनपरिक्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र वनविभाग (प्रादेशिक) यांच्या जासई येथील कार्यालयात फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चरनेर-उरण, रायगड यांच्यातर्फे सर्पजनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. फॉन संस्थेचे संस्थापक प्रमुख मार्गदर्शक जयवंत ठाकूर यांनी उपस्थितांना सापांची ओळख व माहिती देत मार्गदर्शन केले.




सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे व काय करू नये? याबद्दल माहिती, सापांबद्दल असणारे समज व गैरसमज,वनकर्मचारी कर्तव्यावर असताना त्यांना सर्पदंश होण्याची भीती सर्वाधिक असते म्हणून सापांची ओळख असावी व त्यातील विषाचा प्रकार व तीव्रता, विषारी साप चावल्यानंतर होणारे परिणाम ही सर्व माहिती असावी त्याबाबत सर्व माहिती सांगितली. फॉन संस्थेतर्फे महाराष्ट्र वनविभागास नेहमीच सहकार्य असेल,तसेच संस्थेतर्फे वनकर्मचाऱ्यांसाठी वन्यजीवांवरील माहितीपर प्रशिक्षण कार्यक्रम भविष्यात होतील,अशी ग्वाही फॉन संस्थेचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांनी दिली.

या कार्यक्रमास, उरण वनविभागाचे सर्व वनपरिमंडळ अधिकारी, वनरक्षक व उरण वनविभाग कार्यालयाचे कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. फॉन संस्थेचे सदस्य दिनेश चिरनेरकर यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी एन. जी.कोकरे वनपरिक्षेत्र अधिकारी, उरण, व भाऊसाहेब डीविलकर महाराष्ट्र वनविभाग यांचे विशेष मोलाचे सहकार्य लाभले.

# दुचाकीस्वाराचा अपघातात मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

मुंब्रा येथून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार ट्रकच्या चाकाखाली आल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना पनवेल-मुंब्रा मार्गावर आरएएफ चौकाजवळ घडली.

अनिकेत लक्ष्मण सपकाळ (२८) हा तळोजा येथील धरणा कॅम्पमध्ये राहत होता. अनिकेत दुचाकीवरून कामावर जात होता. पनवेल-मुंब्रा मार्गावरील आरएएफ सिग्नलवरून जाताना मागून भरधाव ट्रकने त्याला धडक दिली. ट्रकच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने ट्रक त्याच ठिकाणी सोडून पलायन केले. तळोजा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# आगरी बोलीच्या आंग्रु डुंग्रू कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आग्रोळीच्या बि.टी. रणदिवे ग्रंथालयात शनिवारी भूमिपुत्र सामाजिक प्रतिष्ठान नवीमुंबई ' निर्मित आंग्रु डुंग्रू हा आगरी बोलीचे वैभव सांगणारा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात ज्ञानेश्वरीतील आगरी शब्द, आगरी म्हणी, धवला-लग्न गिते, आगरी बोली गोष्ट,कविता, किस्से सादर करण्यात आले.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून राजेश पाटील आग्रोळी, बि.टी. रणदिवे कमिटी सदस्य, आग्रोळी गावचे ग्रामस्थ आणि नवीमुंबईचे अनेक कवी उपस्थित होते. या कार्यक्रमाची संकल्पना गजआनन म्हात्रे यांची असून त्यांनीच सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर कवयत्री मिनाक्षी तांडेल, स्मिता वाजेकर, धवला गायिका संगीता पाटील आणि लेखक-कवी गजआनन म्हात्रे हे होते. प्रेक्षकात उपस्थित दहा कवींनीही आपल्या आगरी कविता सादर केल्या.

आगरी बोलीच्या ह्या कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजसेवक नारायण मुकादम, नाट्य लेखक अनिल मुनघाटे, रणदिवे ग्रंथालयाचे विश्वस्त राजेश पाटील यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

# नवी मुंबई महापालिका जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धापूर्व बैठक उद्या

**नवी मुंबई : बातमीदार**

नमुंमपा क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने स्वतंत्र जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धा आयोजनासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध स्पोर्टस् असोसिएशन, जिमखाना, खाजगी शाळा व संस्था वेळोवेळी सक्रीय सहभागी होऊन मदत करीत असतात.

केंद्र शासनाच्या स्कुल गेम फेडरेशन ऑफ इंडिया यांचेकडून सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून त्या अनुषगांने मा. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील जिल्हा क्रीडा अधिकारी यांची बैठक घेऊन राज्यस्तरीय स्पर्धा आयोजन करण्याचे सूचित केलेले आहे.

त्या अनुषंगाने विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा संचालनालय, मुंबई विभाग आणिजिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांच्या सहकार्याने नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षामधील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात येणार आहे.

या स्पर्धांमध्ये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या तसेच शासन मान्यताप्राप्त खाजगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सहभागी होऊ शकतात. याकरिता स्पर्धापूर्व बैठकीचे आयोजन मुंबई विभागीय उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांच्या उपस्थितीत २३ जुलै, २०२५ रोजी, सकाळी ११ वा, विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी येथे करण्यात आलेले आहे.

या बैठकीमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता ऑनलाईन प्रणाली व नव्याने समावेश करण्यात आलेल्या विशेष बाबींविषयी सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. शासनाच्या वतीने व महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम व उपक्रम याबाबतची माहितीही यावेळी देण्यात येणार आहे.

त्यानुसार जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ च्या आयोजनपूर्व बैठकीस नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या व शासन मान्यताप्राप्त खाजगी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये यांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक तसेच शासन मान्यताप्राप्त अधिकृत खेळांच्या विविध असोसिएशनचे पदाधिकारी, शहरातील जिमखाना, स्पोर्टस् असोसिएशनचे प्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# माथेरानला पर्यायी मार्ग कधी उपलब्ध होणार?

**माथेरान : प्रतिनिधी**

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरान मध्ये दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढते आहे. त्यातच या ठिकाणी वाहनांच्या पार्किंगची संख्या मर्यादित असल्याने नेरळ-माथेरान या घाटरस्त्यात सुट्ट्यांच्या हंगामात वाहनांची प्रचंड गर्दी होत असून वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांना मनःस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत सर्व माहिती प्रशासनाला ज्ञात असतानादेखील इथे अद्याप पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जात नसल्याने नागरिक आणि पर्यटकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या वर्षी जून महिन्यापासून दर शनिवार व रविवारी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याने या दिवसात घाटातच आपल्या गाड्या पार्क करून त्यांना आपल्या लवाजम्यासह माथेरान गाठावे लागत आहे. अशी परिस्थिती अजून कुठपर्यंत सुरू राहणार आहे? दोन दिवस आरामासाठी आणि इथले नैसर्गिक सौंदर्य न्याहाळण्यासाठी येणाऱ्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पर्यटक येत आहेत म्हणून इथे सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यांनाच जर का सुविधा निर्माण केल्या नाहीत, तर या स्थळाला आगामी काळात धोक्याची घंटा नाकारता येत नाही, असे ज्येष्ठ मंडळी बोलत आहेत. संबंधितांनी या ठिकाणी लक्ष केंद्रित करून पर्यटनास चालना द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या संदर्भात भाजपचे माथेरान अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी सांगितले की, माथेरान रोपे प्रा. लि. कंपनीला रोपे वेसाठी सर्व परवानग्या दिलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा २०१६मध्येच परवानगी दिली आहे. आता त्याला जवळजवळ नऊ वर्ष झाली. त्यांना आतापर्यंत निधी उभा करता आला नाही? जर ते हा प्रकल्प करण्यास असमर्थ असतील, तर शासनाने हा प्रकल्प ताब्यात घ्यावा.

पर्यटकांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. परंतु आज जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे ते अपुरे आहे. प्रकल्प उभा करण्यासाठी प्रशासनाने लक्ष घातले पाहिजे, परंतु या कंपनीच्या प्रवर्तकांच्या दबावापुढे शासकीय अधिकारी काहीच करत नाहीत. ते रोपवे करत नाहीत आणि एमएमआरडीएच्या फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पाला आक्षेप घेतात. या प्रवर्तकांकडून (कर्जत) भुतिवलीमार्गे माथेरान रोप वे प्रकल्प शासनाने एमटीडीसी अथवा एमएमआरडीए च्या माध्यमातून पूर्ण करावा आणि माथेरानकरांचे व पर्यटकांचे हाल संपवावेत, अशी मागणीही प्रवीण सकपाळ यांनी केली आहे.

## व्यापाऱ्याच्या गळ्यातील चेन खेचून चोरटे पळाले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दोन दिवसांपूर्वी चार दुकाने अज्ञात चोरट्यांनी फोडल्याची घटना ताजी असताना रविवारी रात्री दहाच्या सुमारास मोटरसायकलवरून आलेल्या अज्ञात चोरट्यांनी एका व्यापाऱ्याच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून पलायन केले.

आदिनाथ गोल्डचे मालक केवल नरसीमल ओसवाल हे शहरातील महावीर पेठेच्या रस्त्यावरून घरी जाताना भरधाव येणाऱ्या मोटरसायकलवरील दोन चोरट्यांनी धक्का मारून त्यांच्या गळ्यातील १७ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन खेचली व ते सुसाट वेगाने पसार झाले. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


महावितरण

**निविदा सुचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत ''फुल टर्नकी बेसिस'' वर, ओ अँड एम योजनेअंतर्गत एल.टी. लाईन्स ना एल.टी. स्पायरल टाईप पी.व्हि.सी. स्पेसर्स चे डिझाइन, शॉप टेस्ट, पुरवठा, वाहतूक, निश्चित करणे आणि संबंधित कामांसाठी (अंदाज पत्रकीय रक्कम १०.०० लाख) नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यासाठी ई-निविदा क्रमांक टी-१३/०७-२०२५ महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि.२१.०७.२०२५ ते २५.०७.२०२५ (संध्या ०३.०० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. २५.०७.२०२५ ला संध्या ०५.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/ शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

PRO NO-215 — कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग



**सावधान नोटीस**

तमाम जनतेस या सावधान नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- ओवे, ता. पनवेल, जि रायगड, येथील खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल श्री. सिताराम राजाराम रेवणे तर्फे कुलमुखत्यारी श्री. संजय सिताराम रेवणे, यांनी श्री. जयंत धोंडू रेवणे, वगैरे, यांचे विरुद्ध खालील वर्णन केलेल्या मिळवतीबाबत वाद उपस्थित झालेला असल्यामुळे, मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर पनवेल, यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ४२५/२०२४ कडे दाखल केलेला आहे. तरी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीवर आमच्या अशिलांना कायदेशीरपणे मालकी हक्क व अधिकार प्राप्त झालेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

**अ) मौजे ओवे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| अ. क्र. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ३४६ | १५५ | ०-०२-०० | ०.०४ |
| २ | ३४६ | ११२ | ०-०८-०० पो.ख ०-०-५० | ०.१५ |
| ३ | ३४६ | ५८ | ०-०८-०० पो.ख ०-०-०५ | ०.१५ |
| ४ | ३४६ | १५७ | ०-०१-०० | ०.०२ |
| ५ | ३४९ | ११ | ०-१५-७० पो.ख ०-०२-०० | २.२० |
| ६ | ३८१ | ७६ | ०-०६-०० पो.ख ०-०१-० | ०.१६ |
| ७ | ३८३ | ४० | ०-६-०० पो.ख ०-०१-०० | ०.१४ |
| ८ | १० | ० | ३-५४-०० पो.ख ५-८८-०० | ७.३१ |
| ९ | ११ | ० | ०-७१-०० पो.ख ०-००-०० | १.७२ |
| १० | १२ | ० | ०-१९-०० पो.ख ०-०४-५० | २.८७ |
| ११ | १३ | ० | १-५३-२० पो.ख ०-१४-७० | २३.७८ |
| १२ | १४ | १ | ०-३४-८० पो.ख ०-०२-०० | ३.४४ |
| १३ | १४ | ४ब | ०-०१-०० पो.ख ०-००-०० | ०.१२ |
| १४ | १९ | १/२/३/४ | १-१८-०० पो.ख ०-००-०० | ४.९२ |
| १५ | ३ | १/२ब | ०-०१-०० पो.ख ०-००-०० | ०.०३ |
| १६ | ४ | १/२ | ०-४४-३० पो.ख ०-००-०० | ३.६६ |
| १७ | ५ | १/२/४/५/६/९ | ४-१०-०० पो.ख ०-१६-०० | १३.९२ |
| १८ | ५ | १० | ०-१२-०० पो.ख ०-००-०० | ०.४१ |
| १९ | ४५५ | १/६५ | ०-०३-१२ | ०.०० |
| २० | ४५५ | १/२ | ०-०९-०० | ०.०० |

तसेच आमचे अशिल यांनी श्री. जयंत धोंडू रेवणे, वगैरे, यांचे विरुद्ध पनवेल येथिल मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात निगोशिएबल इंस्ट्रूमेंट ॲक्टनुसार फिद दाखल केलेली आहे व सदरची फिर्याद पनवेल येथिल मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, यांच्या न्यायालयात चालू आहे.

तरी आमचे अशिलांचे वतीने सर्व तमाम जनतेस या सावधान नोटीसीद्वारे कळवितो की. वर नमुद मिळकती सदरी नमुद असलेल्या व्यक्तींबरोबर किंवा त्यांचे वतीने एजंट, मुखत्यारी वगैरे. यांच्या बरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार मदार करू नये, केल्यास अशा कोणाच्याही कोणत्याही प्रकारचा होणाऱ्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार असणार नाहीत, तसेच अशा प्रकारचा कोणताही करार मदार करणारे आमच्या अशिलांच्या होणाऱ्या नुकसानीस जबाबदार राहतील. याची तमाम जनतेनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल

दिनांक :- २१/०७/२०२५

सही/-

(ॲड. स्वानंद भा. नवाळे)

वकील

पत्ता-: गाळा नं. ८, श्री लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसा. टिळक रोड, पनवेल ४१० २०६, जि.-रायगड. मो.नं. ९७०२०३५८०५


## रेवदंड्यात वाळूतस्करी पकडली

### ट्रकसह माल जप्त; चालकावर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्र किनारी वाळू उत्खनन करून तस्करी करणारा मालवाहतूक ट्रक पोलिसांनी रंगेहाथ पकडून वाहनासह १५ लाख २६ हजार ७४२ रुपये किमतीचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेली अनेक वर्षे अलिबाग आणि मुरूड तालुक्यातील किनारपट्टीवर बेकायदा वाळू उत्खन्नन करून वाळू तस्करी केली जात आहे. यामुळे समुद्र किनाऱ्यांची मोठ्या प्रमाणात धूप होत आहे. याबाबत अनेक तक्रारी येथील स्थानिकांनी केल्या आहेत, मात्र तरीही राजरोसपणे वाळू तस्करी असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

अशाच प्रकारे रेवदंडा पोलीस हद्दीत साळाव चेकपोस्ट येथे रेवदंडा-साळाव रस्त्यावर रविवारी (दि. २०) पहाटे ३.१५च्या सुमारास कनार्टकच्या बेळगावमधील हुक्केरी तालुक्यातील कणगल येथील मनोजकुमार तानाजी पाटील (वय २९) हा माल वाहतूक ट्रकमधून (एमएच ०९ ईएम ६९३०) बेकायदेशीररित्या समुद्राची वाळू उत्खन्नन करून वाहतूक करीत होता. त्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे बोर्ली मंडळाचे तलाठी हेमंत सुधाकर चांदोलकर यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी १५ लाख रुपये किमतीचा माल वाहतूक ट्रक, त्यामध्ये अंदाजे प्रति ४४५७ रुपये ब्रास अशी सहा ब्रास वाळू, जिची अंदाजे किंमत २६७४२ रुपये आहे, असा एकूण १५ लाख २६ हजार ७४२ रूपये किमतीचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी ट्रकचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, या वाळू उत्खननामागचा सूत्रधार कोण याचा शोध घेऊन त्यालाही अटक करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## माणगाव येथून बाप-लेक बेपत्ता



**माणगाव : बातमीदार**

बेलदारवाडी-म्हसळा बायपासच्या बाजूला तालुका माणगाव येथून भारत यशवंत पवार (वय ३५) हे आपली चार वर्षाची मुलगी भावना हिच्यासह हरवले आहेत. त्यांची पत्नी कमल भारत पवार (रा. रुद्रवली) यांनी पतीसह मुलगी माहेरी आलेल्या आईच्या घरातून कोठेतरी निघून गेल्याची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दिली आहे.

भारत पवार या व्यक्तीचे वर्णन रंग सावळा, उंची पाच फुट पाच इंच, केस काळे, डोळे साधे, उजव्या खांद्यावर शंकराचा फोटो गोंदाविलेला असून अंगात काळया रंगाचा हाफ हाताचा टी-शर्ट, काळया रंगाची पॅन्ट आहे. मुलगी भावना पवार हिचा रंग गोरा, उंची तीन फूट, केस काळे, डोळे घारे असून अंगात पिवळ्या रंगाचा टॉप व लाल रंगाची चड्डी आहे.

उपरोक्त वर्णनाची व्यक्ती व मुलगी मिळून आल्यास माणगाव पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन हवालदार सुरज फडताडे (८२३७२१९२३१) यांनी केले आहे.


**सावधान नोटीस**

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, **श्री. कृष्णा नारायण वाघ उर्फ कातकरी वगैरे** यांच्या मालकीच्या खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकती नवी मुंबई प्रकल्पाकरीता संपादीत केलेल्या असून सदर संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे - नागाव, ता. उरण, जि. रायगड**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए. गुंठा | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|---|
| नागांव | २/१३ | ८८ | १+२ | २-०-० | ४.०६ |
| नागांव | २/१३ | ८९ | २ | ४-१-८ | २०.८२ |

वर नमूद संपादीत मिळकतीपोटी **श्री. कृष्णा नारायण वाघ उर्फ कातकरी** वगैरे यांना सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजने अंतर्गत खालील वर्णनाचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे.

**मौजे - द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड**

| भूखंड क्र. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| ५८ | ६५ | २१५० चौ.मी. |

सदर भूखंडाबाबत **श्री. कृष्णा नारायण वाघ उर्फ कातकरी वगैरे** यांनी आमचे अशिल **मे. ओम साई डेव्हलपर्स तर्फे श्री. प्रविणभाई जेठालाल पटेल** यांच्या लाभात करारनामा लिहून दिलेला असून त्यापोटी आमच्या अशिलांकडून बरीच मोठी रक्कम स्विकारलेली आहे. त्याअनुषंगाने आमच्या अशिलांनी वर नमूद भूखंडाबाबत पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात स्पे.मु.नं. २६६/२०१३ हा दावा दाखल केलेला आहे. परंतु, **श्री. कृष्णा नारायण वाघ उर्फ कातकरी वगैरे** हे अनाधिकाराने सदर भूखंडामध्ये त्रयस्थांचे हक्क, हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांना समजले आहे. सबब, प्रस्तुतची सावधान नोटीस आमचे अशिल प्रसिध्द करीत आहेत.

सबब, तमाम जनतेस या नोटीसीने सावधान करण्यात येत आहे की, वर नमूद भूखंडाबाबत **श्री. कृष्णा नारायण वाघ उर्फ कातकरी वगैरे** अथवा इतर कोणाहीबरोबर कोणत्याही स्वरुपाचा करार/मदार/व्यवहार करु नये आणि केल्यास असा व्यवहार बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल.

तारीख: २१/०७/२०२५.

सही/-

ॲड. श्री. प्रशांत अशोक भुजबळ

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.मो. क्र. : ९९३०३६९८६१


## वडघर मुद्रे विद्यालयात रानभाज्यांचे प्रदर्शन



**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयात नुकतेच रानभाजी प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यालयातील २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत वेगवेगळ्या १३ रानभाज्या मांडल्या होत्या.

विविध रानभाज्यांची माहिती सहभागी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सांगितली. विद्यार्थ्यांनी रानभाज्या माहिती देणारी भित्तीपत्रके तयार केली होती तसेच या रानभाज्यांची वैशिष्ट्यपूर्ण असलेली चव मिळावी यासाठी सर्व रानभाज्या आपापल्या घरून तयार करून आणल्या होत्या.

रायगड जिल्ह्यात सुमारे पन्नासहून अधिक रानभाज्या पावसाळ्यात उपलब्ध होतात. या रानभाज्यांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी तसेच रानभाज्यांचे औषधी गुणधर्म त्यांना कळावे यासाठी विद्यालयात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन पाटील यांनी या रानभाज्यांची वैशिष्ट्ये, गुणधर्म व उपयुक्तता याबाबत विद्यार्थ्यांना माहिती करून दिली तसेच विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात सहभाग घेऊन अत्यंत चांगली माहिती दिल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष सर्वसामान्यांचा आधार

मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरिता रुग्णांना संबधीत रुग्णालयामार्फत अर्थिक सहाय्य देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात त्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असल्याने नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे २०२५ रोजी औपचारिक उद्घाटन करुन सुरु करण्यात आलेला आहे.

राज्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी प्रत्येक जिल्हयातच जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती सहज उपलब्ध, संलग्न रुग्णालयाची यादी, अर्ज आणि पाठपुराव्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नाही तसेच अर्ज स्विकृती व सध्यस्थिती इत्यादी मदत पुरवली जाणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळवण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे :- अर्ज (विहीत नमुन्यात), रुग्ण दाखल असल्यास Geo Tag फोटो ३. वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक/प्रमाणपत्र मुळप्रत डॉक्टरांच्या सही व शिक्यासह (रुग्णालय खासगी असल्यास जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष-वैद्यकीय अधिकारी, अधिष्ठाता, अधिक्षक, संबंधीत विषयातील प्राध्यापक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय) यांचेद्वारे प्रमाणित केलेले असावे. तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला. (रु.१.६० लाखपेक्षा कमी उत्पन्न असणे आवश्यक आहे.) रुग्णाचे आधारकार्ड. (महाराष्ट्र राज्याचे) लहान बालकांसाठी आईच्या आधार कार्ड, संबंधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे. रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी. अपघात असल्यास FIR असणे आवश्यक आहे. अवयव प्रत्यारोपण असल्यास रुग्णालयाचे मान्यता प्रमाणपत्र अथवा ZTCC येथे नोंदणी केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळणाऱ्या आजारांची नावे :- कॉकलियर इम्प्लांट (वय वर्षे २ ते ६), हृदय प्रत्यारोपण,. यकृत प्रत्यारोपण, किडणी प्रत्यारोपण, बोन मॅरो प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, अपघात शस्त्रक्रिया, लहान बालकांचे शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, अपघात, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), नवजात शिशुंचे आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, बर्न रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण

योजनेसंबंधित महत्त्वाच्या बाबीः- महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम RBSK, धर्मदाय रुग्णालये या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये उपलब्ध सीमित निधीचा वापर करून वरील योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या रुग्णांना लाभ देण्यात येतो. रुग्णालयातून रुग्ण डिस्चार्ज झाल्यामुळे त्याची शहानिशा करणे शक्य नसल्याने अशा रुग्णांना अर्थसहाय्य देणे शक्य नाही.

राज्याबाहेरील रुग्णालयांवर राज्य शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे त्यांच्याकडून उपयुक्तता प्रमाणपत्र घेणे शक्य नसल्याने राज्याबाहेरील रुग्ण/रुग्णालयांसाठी अर्थसहाय्य करणे प्रतिबंधित करण्यात आलेले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार २५ हजार, ५० हजार, एक लाख व महत्तम दोन लाखांपर्यंत आजारनिहाय मर्यादित रक्कम प्रदान करण्यात येते.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**


**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा**

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)

पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ महाराष्ट्र-४००७०४

**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**

An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India

Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

| दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
|---|---|---|
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in — ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**

**दिनांक : 29.07.2025**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष २०२५-२६ हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **(भौतिक विज्ञान** / PHYSICS **)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.एस.सी.) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (Trained GraduateTeachers) **संस्कृत**/SANSKRIT **हिन्दी**/ HINDI **अंग्रेजी**/ ENGLISH | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी.ए.) एवं बी.एड डिग्री |
| **प्राथमिक शिक्षक** (PRIMARY TEACHER) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ १२ वी पास एवं डी.एड डिग्री और सी.टी.ई.टी. |
| **प्रशिक्षक :** SPECIAL ECUCATOR | विशेष शिक्षा में स्तानक की डिग्री और बी.एड. या विशेष शिक्षा में डिप्लोमा / स्नातकोत्तर डिप्लोमा के साथ बी.एड. (सामान्य) भारतीय पुनर्वास परिषद (RCI) द्वारा मान्यता प्राप्त समकक्ष योग्यता। |

**साक्षात्कार दिवस :** 29.07.2025 **(मंगलवार)**

**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM

**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

सही/-

प्राचार्य

पीएम श्री केवि एन. एडी करंजा

प्राचार्य/Principal

पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/PM SHRI Kendriya Vidyalaya

एन.ए.डी. करंजा / N.A.D. Karanja

उरण,जिला-रायगढ़ (महाराष्ट्र)/Uran, Dist.-Raigad (MH.)

# टीम इंडियाला दुखापतींचे ग्रहण

## चौथ्या कसोटीपूर्वी अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी 'आऊट'

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत-इंग्लंड यांच्यातील अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी स्पर्धेतील पाच सामन्यांच्या मालिकेत १-२ अशा पिछाडीवर असलेल्या भारतीय संघातील अष्टपैलू खेळाडू मालिकेतील उर्वरित दोन्ही सामन्यातून बाहेर पडला आहे. चौथ्या कसोटी सामन्याआधी टीम इंडियाच्या ताफ्यात दुखापतीचे ग्रहण लागले असून संघ बदलण्याची वेळ टीम इंडियावर आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अधिकृतरित्या या संदर्भात माहिती दिली.

बीसीसीआयच्या अधिकृत एक्स अकाउंटवरून देण्यात आलेल्या माहितीनुसार अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी गुडघ्याच्या दुखापतीमुळे उर्वरित दोन्ही सामने खेळणार नाही. तो मालिकेतूनच आऊट झाला असून लवकरच तो मायदेशी परतणार आहे.



बीसीसीआयने अर्शदीप सिंग संदर्भातही अपडेट दिली आहे. मँचेस्टरच्या मैदानात रंगणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यासाठी तोदेखील संघ निवडीसाठी उपलब्ध नसेल. नेट्समध्ये सराव करताना साई सुदर्शनचा चेंडू अडवताना त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला दुखाप झाली आहे. तो मेडिकल टीमच्या निरीक्षणाखाली आहे.

बीसीसीआयने चौथ्या कसोटीआधी नितीश कुमार रेड्डी आणि अर्शदीप यांच्या दुखापतीसंदर्भात अपडेट दिले असले तरी ऋषभ पंत आणि आकाश दीपच्या दुखापतीवर मात्र मौन बाळगले आहे. लॉर्ड्स कसोटी सामन्यातील तिसऱ्या कसोटी सामन्यात पंतच्या बोटाला दुखापत झाली होती. त्यामुळे तो फक्त बॅटिंग करताना दिसला होता. आकाश दीपही स्नायू दुखापतीने त्रस्त होता. हे दोघे प्लेइंग इलेव्हनमध्ये कायम राहणार की त्यांना बाकावर बसवण्याची वेळ येणार तेही पाहण्याजोगे असेल.

### अंशुल कंबोजची एन्ट्री

भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. २३ जुलैपासून रंगणाऱ्या या सामन्यासाठी उजव्या हाताचा जलदगती गोलंदाज अंशुल कंबोज याची टीम इंडियात एन्ट्री झाली आहे. त्याला कसोटी पदार्पणाची संधी मिळू शकते.

# बुद्धीबळ स्पर्धेत अरुणा मयेकर, नुपूर जमनू पदकाच्या मानकरी

**मुरूड : प्रतिनिधी**

जय श्रीराम बुद्धीबळप्रेमी संघटना, जय श्रीराम नागरी पतसंस्था मुरूड आणि रायगड जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव येथील माळी समाज सभागृहात बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील १०३ स्पर्धकांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रायगड जिल्हा बुद्धीबळ संघटनचे अध्यक्ष विलास म्हात्रे व दिलीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा १६ वर्षाखालील आणि खुला गट अशा दोन गटात झाली. या स्पर्धेवेळी जय श्रीराम नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, संचालक सुनील विरकुड, गणेश



ठोसर, सिद्धेश गद्रे, डॉ. संजय पाटील, सुशील गुरव, नांदगाव सरपंच अल्पा घुमकर, विद्याधर चोरघे, प्रभाकर गाणार, मंगेश कमाने, रमेश पाटील, मयुरेश गद्रे, जनार्दन पुगावकर, मुख्य पंच अर्थव दातार, संजय ठाकूर आदी उपस्थित होते.

खुल्या गटात अरुणा विजय मयेकर, तर १६ वर्षाखालील गटात नुपूर संजय जमनू या पदकाच्या मानकरी ठरल्या. याशिवाय खुल्या गटात प्रथम क्रमांक समनिल गुरव, द्वितीय वेदांत मेहता व तृतीय आयन दावणे; तर १६ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक अर्थव वाघ, द्वितीय गौतम पवार व तृतीय क्रमांक आयुष पाटील याने पटकाविला. सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

मुरूड तालुक्यात प्रथमच आयोजित बुद्धीबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने आयोजकांचा आत्मविश्वास दुणावल्याचे दिलीप पाटील म्हणाले.

# बुद्धीबळ विश्वचषकाचे भारताला यजमानपद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतातील बुद्धीबळप्रेमींसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर भारताला पुन्हा एकदा प्रतिष्ठित बुद्धीबळ विश्वचषक २०२५चे यजमानपद भूषवण्याचा मान मिळाला आहे. ही स्पर्धा येत्या ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत खेळवली जाणार असून स्पर्धेच्या ठिकाणाची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

बुद्धीबळाची जागतिक नियामक संस्था 'फिडे'ने सोमवारी (दि. २१) या वृत्ताला दुजोरा दिला. या महत्त्वपूर्ण घोषणेमुळे भारतीय बुद्धीबळ क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी विश्वचषक स्पर्धेत जगभरातील २०६ अव्वल खेळाडू सहभागी होतील. विजेतेपदाच्या



लढाईसोबतच हे खेळाडू २०२६मध्ये होणाऱ्या फिडे कँडिडेट्स स्पर्धेतील स्थानासाठीही झुंज देतील.

भारताने यापूर्वी २००२ साली हैदराबाद येथे या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते. त्या स्पर्धेत भारताचे दिग्गज ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंद यांनी विजेतेपद पटकावून इतिहास रचला होता. आता २३ वर्षांनंतर ही स्पर्धा पुन्हा एकदा भारतीय भूमीवर आयोजित होत आहे.

विश्वचषक २०२५ चे आयोजन 'नॉकआऊट' पद्धतीने केले जाणार आहे, ज्यामध्ये प्रत्येक फेरीत पराभूत होणारा खेळाडू स्पर्धेतून बाहेर होईल. फिडेच्या नियमांनुसार स्पर्धेतील अव्वल तीन खेळाडू थेट २०२६च्या कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरतील, जी भविष्यातील विश्वविजेत्याच्या निवड प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते.

### दिग्गज खेळाडू ठरणार आकर्षण

या भव्य स्पर्धेत भारताचे अनेक अव्वल खेळाडू सहभागी होणार असल्याने स्थानिक प्रेक्षकांसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे. यामध्ये विद्यमान विश्वविजेता डी. गुकेश, विश्वचषक २०२३चा उपविजेता आर. प्रज्ञानानंद आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या पाच खेळाडूंमध्ये स्थान मिळवलेला अर्जुन एरिगैसी यांचा समावेश आहे. या खेळाडूंच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची रंगत आणखी वाढणार आहे.

# 'ऑब्स्ट्रक्टिंग द फिल्ड' नियमामुळे पेटला नवा वाद

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये झालेल्या टी-२० मालिकेत भारतीय महिला संघाने इंग्लंडवर दमदार मालिका विजय मिळवला. आता दोन्ही संघांमध्ये वनडे मालिकेचा थरार सुरू आहे. मालिकेतील दुसरा सामना लॉर्ड्सच्या मैदानावर पार पडला. याआधी जेव्हा दोन्ही संघ या मैदानावर आमनेसामने आले होते, त्या वेळी दीप्ती शर्माने केलेले मांकडिंग तुफान चर्चेत राहिले होते. आता इंग्लंडची सलामीवीर फलंदाज टॅमी ब्युमाँटने असे काही केले, ज्यावरून नवा वाद पेटला आहे.

या सामन्यात टॅमी ब्युमाँटने फलंदाजी करत असताना ऑब्स्ट्रक्टिंग द फिल्ड (क्षेत्ररक्षण करताना अडथळा निर्माण करणे) करण्याची कृती केली. त्या वेळी भारतीय खेळाडूंनी जोरदार अपील केले. ऑब्स्ट्रक्टिंग द फील्डनुसार



खेळाडू फलंदाजाला बाद करण्याचे अपील करू शकतात. भारतीय खेळाडू अपील करत राहिले, पण तिसऱ्या पंचांनी तिला नाबाद घोषित केलं.

झाले असे की, इंग्लंडची फलंदाजी सुरू असताना दीप्ती शर्मा गोलंदाजी करत होती. त्या वेळी इंग्लंडची सलामीवीर फलंदाज टॅमी ब्युमाँट स्ट्राईकवर होती. दीप्तीने टाकलेल्या चेंडूवर टॅमी ब्युमाँटने फटका मारला, पण चेंडू जेमिमा रॉड्रिग्जच्या हातात गेला. तिने डाईव्ह मारली आणि चेंडू उचलून वेगाने यष्टीरक्षकाकडे फेकला.

फटका मारल्यानंतर टॅमी धाव घेण्याच्या प्रयत्नात होती, पण जेमिमाने चेंडू अडवला आहे हे पाहताच तिने माघार घेतली. टॅमी आधीच क्रिझमध्ये पोहचली होती, मात्र जेमिमाने केलेला थ्रो तिने आपल्या पॅडने अडवण्याचा प्रयत्न केला. हे खेळाच्या नियमाच्या विरोधात आहे. त्यामुळे भारतीय खेळाडूंनी ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड नियमानुसार जोरदार अपील केले. त्या वेळी पंचांनी हा निर्णय तिसऱ्या पंचांकडे पाठवला. तिसऱ्या पंचांनी पाहिले, त्या वेळी टॅमीचा एक पाय क्रिझच्या आत आणि दुसरा पाय क्रिझच्या बाहेर होता. त्यामुळे तिसऱ्या पंचांनी ती नाबाद असल्याचा निर्णय दिला.

### नियम काय सांगतो?

ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड या नियमात फलंदाज क्रिझच्या आत आहे की बाहेर हे पाहिले जात नाही. नियम ३५.१.१ आणि ३७.१.२नुसार जर एखाद्या फलंदाजाने क्षेत्ररक्षण करत असताना अडथळा निर्माण केला, तर त्याला ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड नियमानुसार बाद घोषित केले जाते, तर ३७.२च्या नियमानुसार, जर फलंदाज क्षेत्ररक्षणात अडथळा निर्माण करत असेल किंवा त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न करत असेल, त्याला बाद घोषित केले जाऊ शकते.

# क्रिकेट-फुटबॉलच्या मैत्रीचा रंगला उत्सव

## टीम इंडिया आणि मँचेस्टर युनायटेडची ऐतिहासिक भेट!

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे सुरू होत आहे. या महत्त्वपूर्ण सामन्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंडमधील प्रसिद्ध फुटबॉल क्लब मँचेस्टर युनायटेडच्या खेळाडूंची भेट घेतली. या भेटीदरम्यान दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकत्र सराव करत एक मैत्रीपूर्ण वेळ घालवला, ज्यामुळे क्रिकेट आणि फुटबॉल या दोन लोकप्रिय खेळांचा एक अविस्मरणीय संगम क्रीडाप्रेमींना पहायला मिळाला.

सध्या भारतीय संघ मँचेस्टरमध्ये आगामी चौथ्या कसोटी सामन्याच्या तयारीत व्यस्त आहे. हा सामना २३ जुलैपासून मँचेस्टरच्या ऐतिहासिक ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर खेळवला जाणार आहे. या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी तणावमुक्त वातावरणाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने भारतीय क्रिकेट संघाने मँचेस्टर युनायटेडच्या खेळाडूंची भेट घेतली.



भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार शुभमन गिल आणि फिरकीपटू कुलदीप यादव यांनी या भेटीबद्दल आपले विचार व्यक्त केले. गंभीर आणि गिल यांनी सांगितले की, मँचेस्टर युनायटेडचे प्रशिक्षक रुबेन अमोरिम आणि कर्णधार ब्रुनो फर्नांडिस यांच्याशी झालेल्या चर्चेचा मुख्य विषय सांघिक खेळात येणारा दबाव, अपेक्षांचे ओझे आणि प्रचंड चाहतावर्गाच्या दबावाखाली स्वतःला कसे स्थिर ठेवावे हा होता. दरम्यान, कुलदीप यादवने ब्राझीलचा खेळाडू कॅसेमिरो याचे कौतुक करत आपण या मिडफिल्डरचे मोठे चाहते असल्याची भावना व्यक्त केली.

व्हिडीओमध्ये टिपलेल्या इतर क्षणांमध्ये, यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत मँचेस्टर युनायटेडचा गोलरक्षक टॉम हीटन याच्याशी मनमोकळ्या गप्पा मारताना दिसतो, तर मँचेस्टर युनायटेडचा कट्टर समर्थक असलेला वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज या भेटीदरम्यान अनेकदा आपले वैशिष्ट्यपूर्ण 'सिऊ' सेलिब्रेशन करण्याचा मोह आवरू शकला नाही. हे सेलिब्रेशन त्याचा आदर्श खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो याला दिलेला एक सलाम होता, जो या क्लबकडून दोन वेळा खेळला आहे.

एका छायाचित्रात, मोहम्मद सिराज हा युनायटेडचा दिग्गज बचावपटू हॅरी मॅग्वायरला गोलंदाजी शिकवताना दिसतो, तर दुसऱ्या छायाचित्रात शुभमन गिल आणि ब्रुनो फर्नांडिस यांच्या गप्पा रंगल्याचे दिसले. त्याचवेळी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह हा मेसन माउंट आणि हॅरी मॅग्वायर यांच्याशी संभाषणात मग्न असल्याचे दिसून आले.

अनेकांनी या अनोख्या भेटीचे कौतुक केले, तर काही चाहत्यांनी दोन्ही संघांसमोरील समान आव्हानांकडे लक्ष वेधले. विशेष म्हणजे दोन्ही संघांनी त्यांच्या मागील अकरा सामन्यांपैकी केवळ दोन सामन्यांत विजय मिळवलाय याकडेही काही चाहत्यांनी लक्ष वेधले.

### खेळीमेळीच्या वातावरणात संवाद

या भेटीची छायाचित्रे आणि व्हिडीओ भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोशल मीडियावर प्रसिद्ध केली आहेत. यामध्ये भारतीय संघातील प्रमुख खेळाडू फुटबॉलपटूंशी अनौपचारिक आणि खेळीमेळीच्या वातावरणात संवाद साधताना आणि फुटबॉल खेळताना दिसत आहेत. या वेळी दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांना आपापल्या संघाची जर्सी भेट देऊन या क्षणाला अधिक खास बनवले. भारत आणि इंग्लंड यांच्यातील ओल्ड ट्रॅफर्ड येथील चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी ही भेट झाल्याने दोन प्रतिष्ठित संघांमधील या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# ऑस्ट्रेलियाच्या मिचेल ओवेनचे पदार्पणातच वादळी अर्धशतक



**किंग्स्टन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेची धडाकेबाज सुरुवात केली आहे. सबिना पार्क येथे खेळल्या गेलेल्या पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियाने यजमान वेस्ट इंडिजवर तीन गडी राखून मात केली. या विजयाचा शिल्पकार ठरला ते पदार्पण करणारा मिचेल ओवेन. त्याने आपल्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय सामन्यात तुफानी अर्धशतकी खेळी खेळून सर्वांची मने जिंकली.

याआधी तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत यजमान वेस्ट इंडिजला ३-० असा क्लिन स्वीप दिल्यानंतर ऑस्ट्रेलियाने टी-२० मालिकेतही विजयी सलामी दिली आहे. किंग्स्टन येथील सबिना पार्कवर झालेल्या पहिल्या सामन्यात नवोदित मिचेल ओवेनच्या वादळी खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजचा तीन गडी राखून पराभव केला. ओवेनने आपल्या कारकिर्दीतील पहिल्याच आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात धडाकेबाज अर्धशतक झळकावण्याची किमया केली. २३ वर्षीय मिचेल ओवेनने अवघ्या २७ चेंडूंत सहा गगनचुंबी षटकारांसह ५० धावांची खेळी साकारली. या कामगिरीमुळे त्याने रिकी पाँटिंग आणि डेव्हिड वॉर्नर यांसारख्या दिग्गजांच्या विशेष क्लबमध्ये स्थान मिळवले आहे.

# टी-२० चॅम्पियन्स लीग पुन्हा सुरू होण्याची शक्यता



**सिंगापूर : वृत्तसंस्था**

सिंगापूरमध्ये सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) बैठकीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. अनेक देशांमध्ये टी-२० लीग खेळल्या जातात. आता आणखी एक टी-२० लीग परत येणार आहे. २०१४नंतर ही लीग बंद करण्यात आली होती, पण आता ती पुन्हा सुरू होणार आहे. विशेष म्हणजे अनेक देशांतील फ्रँचायझी संघ या लीगमध्ये भाग घेतात. या लीगने क्रिकेट जगताचे लक्ष वेधले होते आणि टी-२० फॉरमॅटची लोकप्रियता वाढवली होती.

गेल्या दोन दशकांत टी-२० क्रिकेटने क्रिकेटचे जग पूर्णपणे बदलून टाकले आहे. रोमांचक सामने आणि मनोरंजनामुळे ही लीग चाहत्यांना प्रचंडल आवडते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, टी-२० चॅम्पियन्स लीग परत येणार आहे. यामध्ये जगभरातील टॉप टी-२० फ्रँचायझी संघ एकमेकांविरुद्ध खेळतील. पुढील वर्षी सप्टेंबरमध्ये ही लीग सुरू होऊ शकते.

टी-२० चॅम्पियन्स लीगचा पहिला हंगाम २००८मध्ये सुरू झाला होता, तर शेवटचा हंगाम २०१४मध्ये खेळवला गेला. शेवटचा हंगाम महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जने जिंकला होता. 'द सिडनी मॉर्निंग हेराल्ड'मधील एका वृत्तानुसार आयसीसीच्या बैठकीत सदस्यांमध्ये चॅम्पियन्स लीग टी-२०च्या पुनरागमनावरही चर्चा झाली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com